

मैत्री हॉलिडेज

- भूनंदनवन काश्मीर - वैष्णोदेवी (दि. १५ मे आणि २९ मे २०२३ - ११ दिवस) खर्च प्रति व्यक्ती : रु. १७,०००/+ रेल्वे तिकीट
- सिमला कुलू- . मनाली - चंदिगढ (दि. १० मे आणि २० मे २०२३ - ९ दिवस) खर्च प्रति व्यक्ती : रु. १६,०००/+ रेल्वे तिकीट
- चारधाम यात्रा (गंगोत्री-यमुनोत्री - केदारनाथ - बद्रीनाथ) (दि. १० जून २०२३) खर्च प्रति व्यक्ती : रु. २३,५००/ + रेल्वे तिकीट
- केदारनाथ - बद्रीनाथ यात्रा (दि. १० जून २०२३) खर्च प्रति व्यक्ती : रु. १६,५००/ + रेल्वे तिकीट
- केदारनाथ यात्रा (दि. १० जून २०२३) खर्च प्रति व्यक्ती : रु. ११,५००/ + रेल्वे तिकीट
- श्री काशी-गया-प्रयाग-चित्रकूट-भुवनेश्वर-जगन्नाथपुरी-कोणार्क-कोलकाता-गंगासागर (दि. २ एप्रिल २०२३ - कालावधी - १४ दिवस) खर्च प्रति व्यक्ती - रु. १५,०००/- (बस यात्रा)

पत्ता : लोटस पॅलेस, सेक्टर- २ ए, प्लॉट न. ८९, करंजाडे - पनवेल

संपर्क - ८४४६५११९२५, ९९६१९३२७५७



शुक्रवार, १७ फेब्रुवारी २०२३

# राम प्रहर

वर्ष १५ • अंक २१० • www.ramprahar.com

• पाने ८ • किंमत ₹ २ • रायगड



**अंतरंग**

- रायगडातील पुरुष बचत गटाचे पंतप्रधानांकडून कौतुक/२
- ऐरोली विभागासाठी १० कोटींचा निधी मंजूर/६
- राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत रामशेठ ठाकूर विद्यालयास कांस्यपदक/८


### पनवेलची स्मार्ट सिटीच्या दिशेने होणार वाटचाल

# महानगरपालिकेचा पाणीपुरवठा आणि मलनिस्सारणाचा प्रश्न मार्गी

## तब्बल ३५५ कोटी ७४ लाख रुपयांच्या निधीला मान्यता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेला मलनिस्सारण व पाणीपुरवठा प्रकल्पाकरिता तब्बल ३५५ कोटी ७४ लाख रुपये खर्चाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे शहराप्रमाणे ग्रामीण भागाचा विकासही मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्या अनुषंगाने मलनिस्सारण प्रकल्पासाठी २०७ कोटी ५८ लाख रुपये तर पाणीपुरवठा प्रकल्पासाठी १४८ कोटी १६ लाख रुपये खर्चाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० राज्यामध्ये अंलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पाणीपुरवठा, सरोवरांचे पुनरुज्जीवन व हरित क्षेत्र विकास इ. पायाभूत सुविधांची निर्मिती राज्यातील सर्व नागरी स्वराज्य संस्थामध्ये करण्यात येणार आहे. यामध्ये राज्यातील ४४ शहरांमध्ये मलनिस्सारण सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामध्ये पनवेल महानगरपालिकेचा समावेश करण्यात आला आहे. स्वच्छ भारतचे स्वप्न खऱ्या अर्थाने आता पूर्ण होणार आहे. याशिवाय पाणीपुरवठा प्रकल्पालाही मान्यता मिळाल्याने दरवर्षी उद्भवणारी पनवेलकरांची पाण्याची समस्या सुटणार आहे

मलनिस्सारण प्रकल्पासाठी केंद्र शासनामार्फत ६९ कोटी रुपये, राज्य शासनतर्फे ७६ कोटी रुपये अनुज्ञेय अनुदान मिळणार असून पनवेल महापालिकेला खर्चाचा हिस्सा ३० टक्के असणार आहे. यामध्ये खिडुकपाडा, कामोठे, नौपाडा, खारघर (कोपरा आणि बेलपाडा), ओवे



गाव, कळंबोली, मोठा खांदा व ढोंगऱ्याचा पाडा या गावांचे विद्यमान मलनिस्सारण सिस्टिमशी जोडण्यात येणार आहे, तर भिंगारी, पेंधर, टेंभोडे, पिसार्वे, पडघे, तुर्भे, नागझरी, तोंडरे, तळोजा मजकूर, नावडे, रोहिंजण, धाकटा खांदा, तळोजा पाचनंद, वळवली, देवीचा पाडा, पाले खुर्द, घोट, ओवे कॅम्प व घोलवाडी येथे प्लांट उभारणीसाठी निधी उपलब्ध होणार आहे.

पाणीपुरवठा प्रकल्पासाठी एकूण १४८ कोटी १६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी ४९ कोटी केंद्र शासन, राज्य शासन ५४ कोटी रुपये अनुज्ञेय अनुदान मिळणार असून ४४ कोटी रुपये पनवेल महापालिकेचा निधी असणार आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी कार्यान्वयिन यंत्रणा पनवेल महानगरपालिका राहणार असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व राज्य शासनाच्या निर्णयानुसार या प्रकल्पाची अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.



**या दोन्ही प्रकल्पांमुळे पनवेल महापालिका क्षेत्रातील ग्रामीण भागाचाही विकास झपाट्याने होणार आहे. आम्ही महापालिका स्थापन करताना ग्रामीण भागाचा विकास करू, अशा प्रकारचे एक आश्वासन जनतेला दिले होते आणि ते आज देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या कार्यकुशल मार्गदर्शनाखाली पूर्ण होत आहे. आम्हाला केंद्राने व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांचा पाठपुरावा महत्त्वाचा ठरला आहे. या सर्वांचे मी आभार व्यक्त करतो.**

**–परेश ठाकूर, माजी सभागृह नेते**

# ३० हजार शिक्षकांची भरती करणार -मुख्यमंत्री

**वेंगुर्ला : प्रतिनिधी**

राज्यात लवकरच ३० हजार शिक्षकांची भरती केली जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. १६) केली. त्याशिवाय जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. ते शिक्षक समितीच्या त्रैवार्षिक अधिवेशनात बोलत होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या त्रैवार्षिक अधिवेशनाला मुख्यमंत्री एकनाथ

### जुन्या पेन्शन योजनेवर काम सुरू असल्याचीही माहिती

शिंदे यांनी गुरुवारी उपस्थिती दर्शवली होती. या वेळी त्यांनी शिक्षकांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, गेल्या सहा महिन्यांत शासनाने शिक्षण विभागाला दिलासा देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत, त्याचे आम्हाला समाधान वाटते. शिक्षकांनी शिक्षण देण्याचे उदात्त कार्य मोकळेपणाने करावे. शासन त्यांच्यावर कोणतेही



बंधन टाकणार नाही. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार राज्य शासनाने राज्यातील मुलामुलींना समान व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. राज्यात शिक्षकांची ३० हजार पदे शासन भरत असून लवकरच पदभरती केली जाईल, असे एकनाथ शिंदे यांनी या अधिवेशनात सांगितले.

शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन सकारात्मक असून जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न सोडवण्यासाठीदेखील शिक्षण विभाग काम करीत आहे. हा प्रश्न टप्पाटप्प्याने सोडवता येईल का याचाही विचार सुरू असून त्यासाठी लागणारा वेळ शिक्षकांनी शासनाला द्यावा, अशी अपेक्षा एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

## पनवेलमध्ये शिवजयंतीनिमित्त मराठा वेशभूषा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष प्रभाग क्र. १९च्या वतीने रविवारी (दि. १९) छत्रपती शिवाजी महाराज जयंती शोभायात्रेनिमित्त मराठा वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा १५ वर्षांखालील मुलामुलींसाठी असून पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील स्पर्धकांसाठी मर्यादित आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व नाव नोंदणीसाठी चिन्मय समेळ (८७६७१४९२०३) किंवा रोहित जगताप (८६९१९३०७०९) यांच्याशी संपर्क करावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले.

# शिवनेरी किल्ला मार्गावरील तीन टोलनाक्यांवर टोलमाफी

### शिवजन्मोत्सवानिमित्त राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

येत्या १९ फेब्रुवारीला शिवनेरी किल्ल्यावर शिवजन्मोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त शिवनेरी किल्ल्यावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी शिवनेरी मार्गावर लागणाऱ्या तीन टोलनाक्यांवर टोलमाफी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती राज्यभरात उत्साहाने साजरी करण्यात येते. शिवनेरी किल्ल्यावर सलग पाच दिवस शिवजन्मोत्सव साजरा करण्याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची सकारात्मक



चर्चा झाली असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, विशेष उपक्रमाबाबतही राज्य सरकारकडून आखणी केली.

शिवनेरी मार्गावर लागणाऱ्या खालापूर, तळेगाव आणि खेड राजगुरुनगर या टोलनाक्यांवर १९ जानेवारी रोजी शिवजयंतीनिमित्त टोलमाफी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी येणाऱ्या शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## निवडक

### आफ्रिकेतून शनिवारी आणखी १२ चित्ते भारतात येणार

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेतून आणखी १२ चित्ते शनिवारी (दि. १८) भारतात आणले जाणार आहेत. दक्षिण आफ्रिकी चित्त्यांची दुसरी तुकडी ग्वाल्हेर येथे हवाईमार्गे आणण्यात येईल. त्यानंतर त्यांना कुनो येथे आणले जाईल. यामध्ये सात नर आणि पाच मादी चित्त्यांचा समावेश आहे. केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांनी याबाबत माहिती दिली आहे.

### फिलीपीन्सलाही ६.१ रिश्टर स्केलच्या भूकंपाचे धक्के

**मानिला :** फिलीपीन्समध्ये ६.१ रिश्टर स्केलच्या भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. मासबेट भागात भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. युनायटेड स्टेट्स जियोलॉजिकल सर्वेने दिलेल्या माहितीनुसार, या भूकंपाची तीव्रता ६.१ रिश्टर स्केल इतकी होती. या भूकंपामुळे झालेल्या वित्त अथवा जीवितहानीबद्दलची माहिती नाही, तसेच त्सुनामीचा इशारा मिळालेला नाही.

# ‘सीकेटी’मध्ये रंगला अंतरंग कार्यक्रम

### विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे १३ आणि १४ फेब्रुवारीदरम्यान महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षण अभियानांतर्गत आणि जिमखाना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी अंतरंग २०२२–२३ या महोत्सवाच्या माध्यमातून क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, आमदार प्रशांत ठाकूर, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून रायगड भूषण व शिव छत्रपती राज्य





क्रीडा पुरस्कार प्राप्त क्रीडापटू संदीप गुरव, प्रसिद्ध गायिका श्वेता ठाकूर आणि प्रसिद्ध सिनेअभिनेत्री रुचा मोडक, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर, कार्यालय अधीक्षक पी. एस. म्हात्रे, मुख्य लिपिक जी. के. सुर्वे, कला शाखा प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. एम. ए. म्हात्रे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे, मराठी विभाग प्रमुख प्रा. आंबुलगेकर, एनसीसी विभागाच्या सीटीओ प्रा. नीलिमा तिदार आदी उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी, हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेचा असून, उत्साही वातावरणात साजरा होईल, अशा शुभेच्छा दिल्या, तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनी, हा उपक्रम प्रत्येक वर्षी राबविला जावा, असे सूचवून आयोजकांना व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी स्पर्धकांना या स्पर्धांचे महत्त्व पटवून दिले.

या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर, प्रो. डॉ. बी. व्ही. जाधव, भूगोल विभागप्रमुख डॉ. डी. एस. नारखेडे, कार्यालय अधीक्षक पी. एस. म्हात्रे यांची उपस्थिती लाभली. **(पान २ वर..)**

## महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा निकाल सुप्रीम कोर्टाने राखला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाबाबत सुप्रीम कोर्टातील दोन्ही बाजूंचा युक्तीवाद गुरुवारी पूर्ण झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. या प्रकरणाची सुनावणी नबाम रेबिया प्रकरणानुसार होणार का? हे प्रकरण सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे जाणार का? याबाबतचा निकाल सुप्रीम कोर्टाने राखून ठेवला आहे.

सत्तासंघर्षाबाबत सुप्रीम कोर्टात तीन दिवस चाललेला दोन्ही बाजूचा युक्तीवाद गुरुवारी संपला आहे. सुनावणी सुरू झाल्यानंतर कोर्टात शिंदे गटाकडून जोरदार युक्तीवाद झाला. दुपारी लंच ब्रेकची वेळ झाली असतानाही कोर्टाने जेवणाची वेळ पुढे ढकलून सुनावणी सुरू ठेवली. अखेर जोरदार घमासान आणि दावे–प्रतिदावे ऐकत सुप्रीम कोर्टाने हा निकाल राखून ठेवला आहे. पुढील तारीख मात्र कोर्टाने जाहीर केलेली नाही.

# यंदा राज्यात ऊसाचे सर्वाधिक पीक

### दुसऱ्या क्रमांकावर केळी, तर संत्री तिसऱ्या क्रमांकावर

**पुणे : प्रतिनिधी**

महसूल विभागाच्या ई–पीक पाहणी ऑनलाईन बारमाही पिकांच्या नोंदणीत यंदा ऊस या नगदी पिकाची सर्वाधिक नोंदणी झाली आहे. राज्याच्या सर्वच भागांत एकूण पीक नोंदणीपैकी सुमारे चार लाख पाच हजार हेक्टरवर उसाची लागवड झाली आहे. दुसऱ्या क्रमांकावर केळी, तर तिसऱ्या क्रमांकावर संत्री पिकाची नोंदणी झाली आहे. नगदी पिकांच्या लागवडीबरोबरच हंगामी असलेल्या हरभरा, ज्वारी, गहू, कांदा, मका या पिकांचीदेखील आकडेवारी या उपयोजनच्या (प) माध्यमातून समजणे शक्य झाले आहे.

महसूल विभागाने गेल्या चार ते पाच वर्षांपासून राज्यातील पिकांची ऑनलाइन नोंदणी घेण्यास सुरुवात केली आहे. ही नोंदणी ई–पीक पाहणी या उपयोजनमध्ये करता येते. शेतकरीच या उपयोजनमध्ये पिकांची माहिती,



तसेच शेतात उभ्या असलेल्या पिकांची छायाचित्रे अपलोड करू शकतात. जर संबंधित शेतकऱ्याने पिकांचे नोंद ई–पीक पाहणी उपयोजनमध्ये न केल्यास ती तलाठी कार्यालयाच्या वतीने करण्यात येते. त्यानुसार २०२२–२३ या वर्षासाठी महसूल विभागाने केलेल्या ई–पीक पाहणी नोंदणीत आतापर्यंत राज्यात सर्वाधिक ऊस या पिकाची नोंदणी झाली असल्याचे आकडेवारीवरून दिसून आले.

### इतर पिकेही मुबलक प्रमाणात

संत्री पिकाचे राज्यातील ८५ हजार ३१७ हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे. याबरोबरच डाळिंब पिकाची लागवड ६५ हजार ९५२ हेक्टर क्षेत्रावर झाली असून, हे पीक आता राज्यातील सर्वच भागात मूळ धरू लागले आहे. द्राक्षाची लागवड वाढली असून, सुमारे ६५ हजार ६३९ हेक्टर क्षेत्रावर सध्या लागवड झाली आहे.

दरम्यान, ऊस या पिकाच्या लागवडीबरोबरच केळी या पिकाची एक लाख १८ हजार ५९२ हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे. जळगाव या भागात आतापर्यंत केळी या पिकाची जास्तीत जास्त लागवड होत असे. आता मात्र जळगावसह राज्याच्या उर्वरित भागातही या पिकाचे क्षेत्र वाढू लागले आहे.

## चाकूने भोसकून महिलेची हत्या

**नवी मुंबई : बातमीदार**

चाकूने भोसकून महिलेची हत्या झाल्याची घटना सानपाडा येथे घडली आहे. लुटीच्या उद्देशाने हा प्रकार घडला असावा, अशी शक्यता वर्तवली जात आहे. बुधवारी (दि. १५) सकाळी हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून आरोपीचा शोध सुरू आहे.

सायन–पनवेल मार्गालगत वाशी सेक्टर ३० येथील जॉगिंग ट्रॅकलगत हा प्रकार घडला. त्याठिकाणी महिलेचा मृतदेह असल्याचे सफाई कामगारांच्या निदर्शनात आले. याबाबत त्यांनी पोलिसांना कळवले असता, सानपाडा पोलिसांनी त्याठिकाणी धाव घेतली. मृतदेहापासून काही अंतरावर तिची विस्कटलेल्या अवस्थेतली पिशवी आढळून आली. त्यामधील आधार कार्डवरून या महिलेची ओळख पटली आहे. आशा बोराडे (वय ३३) असे महिलेचे नाव असून ती मूळची औरंगाबादची आहे.

सानपाडा परिसरात ठिकठिकाणी पुलाखाली अथवा उघड्यावर आश्रयाला असलेल्यांपैकी ती एक असल्याचे समजते.

# शिर्डी विमानतळावर नाईट लँडिंगला परवानगी

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठपुराव्याला यश





**शिर्डी : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शिर्डीत नाईट लँडिंगची सुविधा प्राप्त झाली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नागरी उड्डयण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचे आभार मानले आहेत.

गेल्या दोन महिन्यांत नागपूर ते शिर्डी हा समृद्धी महामार्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते खुला झाला होता. त्यापाठोपाठ मुंबई ते शिर्डी अशी वंदे भारत एक्सप्रेस सुरू झाली होती. त्यानंतर आता नाईट लँडिंगची सवलत प्राप्त झाल्याने पहाटेच्या काकड आरतीला उपस्थित राहू इच्छिणाऱ्यांना फायदा होणार आहे. यासाठी प्रशासकीय पातळीवर सातत्याने पाठपुरावा होत होता. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी ज्योतिरादित्य शिंदे यांच्याकडे तातडीने हा परवाना देण्याबाबत आग्रह धरला आणि गुरुवारी डीजीसीएकडून हा परवाना प्राप्त झाला.

नाईट लँडिंगचा परवाना प्राप्त झाल्यामुळे शिर्डी यात्रा तर सुलभ होईलच. शिवाय भाविकांच्या संख्येत सुद्धा मोठी वाढ यामुळे अपेक्षित असून स्थानिक अर्थकारणाला गती प्राप्त होईल. उर्वरित प्रक्रिया पूर्ण करून, साधारणतः मार्च, एप्रिलपासून रात्रीचीही विमानसेवा सुरू होईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहचवा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन; शासकीय योजनांच्या लाभाचे वितरण

**ठाणे : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्याजिल्ह्यात योजनांच्या लाभाचे वितरण कार्यक्रम झाले तर लोकांना अपेक्षित असलेले सरकार आपण देऊ शकतो. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचण्याचा हा प्रयत्न आहे. हा नवीन कल्याण पॅटर्न आहे. राज्यातील तळागाळातील लोकांपर्यंत योजना पोहोचल्या पाहिजे, तरच हे खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे सरकार होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

धर्मवीर आनंद दिघे जनकल्याण कार्यक्रमांतर्गत शासकीय योजनांच्या लाभाचा वितरण सोहळा व भव्य लाभार्थी सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील, कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार गणपत गायकवाड, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, माजी आमदार नरेंद्र पवार उपस्थित होते.

मेळाव्यात कामगार कल्याण योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, शिधापत्रिका वाटप, संजय गांधी निराधार योजना, मातृत्व वंदन योजना, श्रावणबाळ योजना, सखी आरोग्य किट, आदी



योजनेच्या लाभाचे सुमारे दहा हजारहून अधिक लाभार्थींना वितरण करण्यात येणार आहे. यातील काही प्रातिनिधिक लाभार्थींना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लाभाचे वितरण करण्यात आले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आग्र्याच्या लाल किल्यातील दिवाण ए आम मध्ये १९ तारखेला छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यास मंजुरी मिळाली आहे. हा आनंदाचा क्षण आहे. या कार्यक्रमास मंजुरी दिल्याबद्दल प्रधानमंत्री, केंद्रीय सांस्कृतिक मंत्री व उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. पहिल्यांदाच छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी होणार आहे. शपथविधी नंतर घेतलेले प्रत्येक निर्णय हे सर्वसामान्यांना मदत करणारे, त्यांना न्याय देणारे आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या योजना कागदावर न राहता लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजे व सरकार घरापर्यंत पोचण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे.केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यासाठी मोठी तरतूद आहे. राज्याच्या हितासाठी निर्णय घेत आहोत. ठाण्यात रस्ते विकसित केले. त्याप्रमाणे कल्याणमध्ये चांगले रस्ते होण्यासाठी प्रकल्पबधितांना युएलसीची घरे मिळण्यासाठी प्रयत्न करू. राज्यातील तरूण स्वतःच्या पायावर उभा राहून दुसऱ्याच्या हाताला काम देणारे उद्योजक होण्यासाठी इनोव्हेशन हबला राज्य शासन सहकार्य करणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजना महाराष्ट्रातील शेवटच्या घटकापर्यंत पोचवू या. योजना फक्त कागदावरच न राहता लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### सर्व स्तरापर्यंत योजना पोहचविणार!

**डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले, राज्य व केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ कल्याण पूर्वमधील लोकांना देण्यात येत आहे. तळागाळातील एकही लाभार्थी वंचीत राहू नये, लोकांपर्यंत त्या पोहचल्या पाहिजेत यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून प्रयत्न करत आहोत. महिलांसाठी राज्य सरकार चांगले काम करत आहे. माता सुरक्षित तर घर सुरक्षित, आपला दवाखाना अशा विविध योजना राबविण्यात येत आहे.**

केंद्रीय राज्यमंत्री पाटील म्हणाले, केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमुळे जनतेला खूप मोठा फायदा मिळत आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी खूप चांगल्या योजना मतदार संघामध्ये राबविल्या आहेत. या योजनांचा लोकांना खूप फायदा होणार आहे.यावेळी लाभार्थींना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते लाभाचे व नवीन शिधापत्रिकाचे वाटप करण्यात आले.

या वेळी आमदार गणपत गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

## महाशिवरात्रीला बाबुलनाथ मंदिरात जलाभिषेकास परवानगी

पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत मंदिर ट्रस्ट, भाविक प्रतिनिधींच्या बैठकीत निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील बाबुलनाथ मंदिर येथे महाशिवरात्री साजरी करण्याबाबत स्थानिक आमदार व राज्याचे पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात मंदिर ट्रस्ट व भाविक प्रतिनिधींची बैठक झाली. यंदा महाशिवरात्रीला मंदिरातील शिवलींगावर बेल व फुल अर्पण करण्यासह जलाभिषेक करण्यास परवानगी देण्याचा सुवर्णमध्य या बैठकीमध्ये काढण्यात आला.

बैठकीस मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नितीन ठक्कर, विश्वस्त प्रदीप श्रॉफ यांच्यासह भाविकांचे प्रतिनिधी आदी मान्यवर उपस्थित होते.

कोरोना काळात मंदिरात पूजाविधीबाबत प्रतिबंध लावण्यात आले होते. तसेच आयआयटीच्या एका अहवालानुसार शिवलींगावर हळदी, कुंकू किंवा इतर पूजा साहित्य वाहिल्याने, चंदनाचा लेप लावल्याने शिवलींगाची झीज, नुकसान होत असल्याचा अहवाल सादर करण्यात आला आहे. याबाबत भाविकांमधून पूजाविधी परत सुरु करण्याबाबत मागणी होती. या मुद्द्यावर स्थानिक आमदार व पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंदिर विश्वस्त व भाविक प्रतिनिधींची आज मंत्रालयात बैठक घेतली. महाशिवरात्रीला बेल व फुल अर्पण करण्यासह जलाभिषेक करण्यास परवानगी देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. मंत्री लोढा म्हणाले, महाशिवरात्रीला बाबुलनाथ मंदिर येथे मंदिर विश्वस्तांसह पोलीस प्रशासन आदी सर्वजण भाविकांच्या मदतीसाठी असतील. भाविकांनी सहकार्य करावे. शिवलींगाची झीज, नुकसान होणार नाही यादृष्टीने काळजी घ्यावी. भाविकांच्या भावनाही महत्वाच्या आहेत.

## टंकलेखन संस्थेच्या समस्यांसाठी प्रयत्नशील

### शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचे आश्वासन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनामार्फत महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालनासाठी सुधारित नियमावली तयार करण्यात आली आहे. ही नियमावली नव्याने मान्यता मिळणाऱ्या संस्थांना लागू असणार असून सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थांचे नुकसान होऊ नये यादृष्टीने शासन सकारात्मक असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

जुनी नियमावली कायम ठेवण्याबाबतच्या संस्था चालकांच्या मागणीबाबत बुधवारी येथे आयोजित बैठकीत मंत्री केसरकर बोलत होते. शालेय



शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, सह सचिव इम्तियाज काझी यांच्यासह वाणिज्य शिक्षण संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री केसरकर म्हणाले, नवीन नियमावली ही नव्याने मान्यता मिळणाऱ्या संस्थांना लागू असेल. त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या संस्थांना आणि त्यांच्या वारसांना जुने नियम लागू राहतील. संस्थाचालकांचे नुकसान होणार नाही याची दक्षता शासन घेईल, तथापि शिस्त लागणेही गरजेचे आहे. संस्थेकडून गैरप्रकार घडल्यास मान्यता रद्द करण्याचे अधिकार शासनाकडे राहतील. संस्थांच्या नूतनीकरणाचे अधिकार शिक्षण उपसंचालकांकडे देण्याचे निर्देश मंत्री केसरकर यांनी दिले.

## पाणीपुरवठ्यामुळे आदिवासी बांधव समाधानी

**चौक : रामप्रहर वृत्त**

पाणी पुरवठा समस्यामुळे त्रस्त झालेले हातनोलीपाडा आदिवासी समाज जलजीवनचा पाणीपुरवठा झाल्याने आनंदीत झाले असून त्यांनी ग्रामपंचायत चौकचे आभार मानले आहेत.

हातनोलीपाडा येथील ग्रामपंचायत सदस्या सीता संजू पवार, ग्रामस्थ पांडुरंग गणपत हिलम आणि गणेश लक्ष्मण वाघमारे यांच्या सततच्या मागणी व पाठपुराव्याने चौकच्या सरपंच रितु ठोंबरे, उपसरपंच राजन गावडे व ग्रामविकास अधिकारी एस. पी. जाधव यांनी नियोजन बद्ध आराखडा तयार करून तो मंजुर करून घेतला. सुमारे २४८ लोकसंख्या असलेल्या या आदिवासी वाडीला एका विहिरीला पंप जोडून पाणी देण्यात आले होते. सतत होणारा खंडित वीजपुरवठा, अशुद्ध पाणी, पुनः उन्हाळ्यात आट नारी विहीर त्यामुळे पाण्यासाठी करावी लागणारी वणवण यामुळे येथील आदिवासी बांधव कंटाळले होते. सरपंच रितु ठोंबरे, उपसरपंच राजन गावडे, ग्रामविकास अधिकारी एस. पी. जाधव सदस्य स्वाती देशमुख, सुवर्णा राणे यांचे प्रयत्न कामी आले. जलजीवन मिशन हे प्रकल्प राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची सुधरीत आवृत्ती आहे. भारत सरकारने २०२४ पर्यंत हर घर नल से जल (एचजीएनएसजे) नावाने १५ ऑगस्ट २०१९ रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केली असून २०२४ पूर्वीच संपूर्ण ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी वाडी, दूर्गम व दुर्मिळ ठिकाणी या योजनेतून पाणी देण्याचा आमचा संकल्प असल्याचे सरपंच रितू ठोंबरे यांनी सांगून ठेकेदार यांनीही कामाचा दर्जा व वेळेतच काम केल्याचे सांगितले.

**जलकुंभाचे नूतनीकरण लवकरच**



रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि जलसंधारण हे देखील मिशनचे सर्वात महत्वाचे पैलू आहेत. पूनरनिर्विकरण केलेले पाणी आणि रिचार्जिंग संरचना वापरणे, जलकुंभाचा विकास, झाडे लावण्यावर भर, पारंपारिक व इतर जलकुंभांचे नूतनीकरण ग्रामपंचायत करणार असल्याचे ग्रामविकास अधिकारी एस. पी. जाधव यांनी सांगितले.

## राज्यातील सहकारी संस्था निवडणूक प्रक्रिया १ मार्चपासून होणार सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोना महामारी आणि इतर नैसर्गिक आपत्तींमुळे प्रलंबित राहिलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूका होणार असून निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. या आदेशानुसार १ एप्रिल २०२१ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत निवडणुकीस पात्र अ, ब, क व ड वर्गातील एकूण २० हजार ६३८ सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया १ मार्चपासून सुरु होणार आहेत, अशी माहिती सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. प्रसिद्धीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे सहकारी संस्थांच्या निवडणुका पूर्व पदावर आणण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने १५ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या आदेशानुसार १ एप्रिल २०२१ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीतील निवडणुकीस पात्र सर्व प्रकारच्या सहकारी संस्था (कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्था वगळता) यांच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक ०१ मार्च २०२३ पासून सुरू करण्याबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आलेले आहेत. या संस्थांच्या निवडणुकांसाठी १ फेब्रुवारी या अर्हता दिनांकावर प्रारूप मतदार याद्या तयार करण्यात येणार आहेत.

त्याचप्रमाणे प्राधिकरणाने सन २०२३ मधील १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीतील निवडणुकीस पात्र अ, ब, क व ड वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया संचालक मंडळाची मुदत संपण्यापूर्वी अनुक्रमे १५०, १२०, ६० व ६० दिवस अगोदर सुरु करण्याबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेश देण्यात आलेले आहेत.

**▮ २० हजार ६३८ संस्था**

*या आदेशानुसार अ, ब, क व ड वर्गातील अनुक्रमे ६३, १०१४, १०१६३ व ९३९८ अशा एकूण २० हजार ६३८ सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्या आहेत. अ वर्ग संस्थांमध्ये प्रामुख्याने २८ सहकारी साखर कारखाने, ३ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, २६ सहकारी सुतगिरण्यांचा समावेश आहे, अशी माहिती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव डॉ. पी. एल. खंडागळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.*

या संस्थांच्या निवडणुकांसाठी संचालक मंडळाची मुदत संपल्याच्या दिनांकावर प्रारूप मतदार याद्या तयार करण्यात येणार आहेत.

ज्या सहकारी संस्था निवडणुकीकरीता प्रारूप मतदार यादी सादर करणार नाहीत किंवा पुरेसा निवडणूक निधी उपलब्ध करणार नाहीत अशा संस्थांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ अंतर्गत कारवाई करण्याबाबतचे आदेश देखील जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत.

## रायगडातील श्री समर्थ पुरुष बचत गटाचे पंतप्रधान मोदींकडून कौतुक

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कातकरी समाजातील श्री समर्थ पुरूष बचतगट, मु.श्रीगाण, पो.कामार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड या बचतगटाने मेजर ध्यानचंद स्टेडीयम, दिल्ली येथे आयोजित आदि महोत्सवात सहभाग घेतला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या स्टॉलला भेट दिली आणि बचतगटाचे अध्यक्ष श्री.दत्ता नाईक यांच्या वारली पेंटींग व कलाकुसरीचे दिलखुलास कौतुक केले. तसेच दिल्लीमधील नागरिकांनीही या स्टॉलला मोठ्या प्रमाणावर भेट देऊन उत्तम प्रतिसाद दिला.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पेण,जि.रायगड यांच्यामार्फत श्री समर्थ पुरूष बचतगट, मु.श्रीगाण, पो.कामार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड या बचतगटास वारली पेंटिंग करून विविध वस्तू निर्मिती करण्यासाठी न्यूक्लिअर बजेट योजनेंतर्गत रू. ३ लाख अनुदान



मंजूर करण्यात आले होते. साक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रत्यक्ष भेट झाल्याने याप्रसंगी दत्ता नाईक यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पेण यांनी केलेल्या सहकार्यामुळेच हा अविस्मरणीय क्षण अनुभवयास आल्याचे सांगितले. अशा प्रकारच्या योजनांमध्ये भाग घेण्यासाठी प्रकल्प अधिकारी श्रीमती शशीकला अहिरराव यांनी आदिवासी समाजातील लोकांना आवाहन केले आहे.

पान १ वरुन

## ‘सीकेटी’मध्ये रंगला अंतरंग कार्यक्रम

या कार्यक्रमाचे वैशिष्ठ्य म्हणजे विविध क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये सांघिक खेळ, क्रिकेट, कॅरम, रस्सीखेच इ. तसेच गायन स्पर्धा, नाट्यस्पर्धा, मेहंदी,रांगोळी स्पर्धा अशाप्रकारच्या विविध स्पर्धा होत्या. क्रिकेटसाठी १६ संघ, रस्सीखेचसाठी आठ संघ तर सांस्कृतिक आणि इतर क्रीडा स्पर्धेत २७० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तानाजी देशमुख यांनी केले. त्याचबरोबर महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक पी. के. गोंधळी, क्रीडा समन्वयक डॉ. व्ही. बी. नाईक, सांस्कृतिक विभागाच्या अध्यक्षा डॉ. जी. एस. तन्वर, सांस्कृतिक समन्वयक गणेश जगताप, प्रा. अन्वेष वेमुला यांनी संयोजक म्हणून काम पहिले तसेच कमलाकर कणेकर, मिलींद साळवी, प्रल्हाद ठाकूर, तानाजी देशमुख, अस्मितक भगत, अभिजित ठाकूर, साईप्रसाद पाटील, शरद सदावर्ते, राजाराम मळेकर, मिलिंद पाटील, लक्ष्मण वाघमारे आणि इतर सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संचालक परेश ठाकूर आदींनी कौतुक केले.

## तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

**अलिबाग : वृत्तसंस्था**

महिलांचे प्रश्न तसेच समस्या सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर महिन्याच्या तिसऱ्या तर तालुका स्तरावर महिन्याच्या चौथ्या सोमवारी महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. सर्व स्तरातील समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून न्याय मिळावा यादृष्टीने महिलांच्या तक्रारी अडचणीची सोय करण्यासाठी व पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सोय उपलब्ध व्हावी, यासाठी महिला लोकशाही दिन राज्य विभागीय जिल्हा आणि तालुका पातळीवर राबविण्यात येतो. जिल्हास्तरावर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तालुका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली तहसिल कार्यालयात सकाळी ११.०० वा. या महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या दिवशी सार्वजनिक सुट्टी आल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी या महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. यासाठी समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रासह दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. अर्जाची आगाऊ प्रत महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर पाठविणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनात न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक आस्थापना विषयक बाबी, तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर ते महिला लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नाही. महिलांच्या समस्यांचे निराकरण स्थानिक पातळीवर झाल्यास त्यांना आपल्या न्याय हक्कासाठी इतरत्र कोठेही जाण्याची आवश्यकता भासणार नाही, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनीत म्हात्रे यांनी केले आहे. या महिला लोकशाही दिनाच्या तक्रारीबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा परिविक्षा अधिकारी एस. एम.वाघमारे भ्रमणध्वनी क्र. ९८३४७४६०६८ यांना संपर्क करावा.



## निवडक

### शिवणसई-आंबे येथे शिवजन्मोत्सव

**पनवेल :** महिला मंडळ आदर्श गाव शिवणसई-आंबे यांच्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा व सत्यनारायणाची पूजा तसेच महिलांसाठी चला जिंकूया पैठणी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन १९ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पनवेल तालुक्यातील शिवणसई-आंबे, श्रीराम मंदिर, राजिप शाळेच्या पटांगणात सकाळी ९ ते रात्री १०पर्यंत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या वेळी उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

### घन:श्याम कडू यांचे अभिनंदन

**चिरनेर :** दै. रायगड टाइम्स, दै. रत्नागिरी टाइम्स, दै. गोवा टाइम्सच्या रौप्य महोत्सवाचे औचित्य साधून उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष व सा. प्रांजलचे विद्यमान संपादक घन:श्याम कडू यांचा निर्भिड पत्रकारितेचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. याबद्दल बाल संस्कार मंदिर शाळेचे चेअरमन तसेच भाजपचे उरण तालुका तालुका चिटणीस रायगडभूषण नरेश म्हात्रे व उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे सल्लागार व सेवानिवृत्त बीडीओ जे. एस. घरत यांनी घन:श्याम कडू यांचे अभिनंदन केले आहे.

### शहर पोलीस ठाण्याची अव्वल कामगिरी

**पनवेल :** राष्ट्रीय लोक अदालत मध्ये पनवेल शहर पोलीस ठाण्याचा सलग चौथ्यांदा समन्स वॉरंट व कोर्ट विभागामध्ये प्रथम क्रमांक आल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ दोन विभागातून सलग चौथ्यांदा लोक अदालत मध्ये समन्स वॉरंट व कोर्ट विभाग पनवेल शहर पोलीस ठाणे यांनी प्रथम क्रमांक पटकावल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी संबंधित विभागाचे पोलीस उपनिरीक्षक संजय देशमुख, हवालदार युवराज येळे, रजनीकांत पगारे, संजय म्हात्रे, नाईक नितीन कुंभार, नंदकुमार आढारी, महिला पोलीस नाईक विद्या भगत आदींचे अभिनंदन केले आहे.



# विद्यार्थ्यांनी जीवनाच्या परीक्षेतही यशस्वी व्हावे

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांचे प्रतिपादन; गव्हाण विद्यालयात शुभचिंतन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यालयाच्या उत्तम निकालाची परंपरा कायम राखून विद्यार्थ्यांनी जीवनाच्या परीक्षेतही यशस्वी व्हावे, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य तथा भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता बारावीच्या परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झाला.



या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अरुणशेठ भगत म्हणाले की, या विद्यालयाच्या उत्तम निकालाची परंपरा विद्यार्थ्यांनी याही वर्षी कायम राखावी तसेच जीवनात यशस्वी होताना विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेऊन विद्यालयाच्या ऋणात राहणे पसंत करावे. या शुभचिंतन सोहळ्याचे प्रमुख अतिथी पनवेल येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्याला ज्या क्षेत्रात रुची आहे ते क्षेत्र निवडावे आणि न्यूनगंडाच्या जोखडातून मुक्त होऊन कठीण परिश्रमाच्या साथीने यशस्वी वाटचाल करावी, अशा शुभेच्छा दिल्या.


शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेवराव ठाकूर यांनी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागास हार्मोनियम भेट दिल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थी प्रतिनिधी रिंकीता हुंबे, धनंजय बटुळे तसेच शिक्षक प्रतिनिधी प्रा. उमेश पाटील यांनी आपले मनोगते व्यक्त केले.

मान्यवरांपैकी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, वहाळ ग्रामपंचायत उपसरपंच अमर म्हात्रे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व प्रमोद कोळी आदींनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे यांनी केले तर इयत्ता बारावीची विद्यार्थिनी रुपाली मंजुळकर हिने सूत्रसंचालन करून आभार मानले.

या वेळी अरुणशेठ भगत यांच्यासह रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्षा तथा माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, जयवंतराव देशमुख, विद्यालयाच्या शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेवराव ठाकूर, संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलचे शाखाप्रमुख तथा रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, उपप्राचार्य प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे तसेच ज्युनियर कॉलेजचे प्रा. राजेंद्र चौधरी, प्रा. माणिक घरत, प्रा. राजू खेडकर, प्रा. उमेश पाटील, प्रा. जयवंती ठाकूर, प्रा. अर्चना पाटील, माध्यमिक विभागाचे सर्व अध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

## खोपटा येथे ट्रान्सफॉर्मरचा स्फोट



**उरण : प्रतिनिधी**

खोपटा खाडी पुलाजवळील रिलायन्स कंपाऊंडमधील ट्रान्सफॉर्मरचा स्फोट होऊन आग लागण्याची घटना गुरुवारी (दि. १६) दुपारी घडली. अग्निशमक दलाच्या जवानांना आगीवर नियंत्रण आणण्यास यश मिळाले आहे, मात्र ट्रान्सफॉर्मरमध्ये लागलेल्या आगीचे कारण स्पष्ट झालेले नव्हते.

गुरुवारी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास द्रोणागिरी नोड परिसरातील खोपटा पुलाजवळील रिलायन्स कंपाऊंडमधिल ट्रान्सफॉर्मरमध्ये स्फोट होऊन आग लागण्याची दुदैवी घटना घडली. आगीची तीव्रता एवढ्या मोठ्या प्रमाणात होती की आगीचे लोट आकाशात उंच झेप घेत होते. त्यामुळे प्रवाशी नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

या आगीच्या घटनेची माहिती सिडको, जेएनपीए येथील अग्निशमन दलाच्या जवानांना मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण आणले. विद्युत पुरवठा करणाऱ्या ट्रान्सफॉर्मरचा स्फोट होऊन आग कशामुळे लागली याचे नेमके समजू शकले नाही. तसेच कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नसल्याचे महावितरण विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. प्रस्तुत प्रतिनिधीने उरण महावितरण विभागाचे उपअभियंता विजय सोनवणे यांच्याकडे घटनेची माहिती घेण्यासाठी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

## रुग्णालय परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** कामोठे येथील एमजीएम रुग्णालय परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध कामोठे पोलीस करीत आहे. अनोळखी व्यक्तीचे वय अंदाजे ३५ ते ४५ वर्षे, डोक्याचे केस काळे वाढलेले, चेहरा उभट, नाक सरळ, डोळे अर्धवट उघडे, तोंड बंद, हनुवटीवर वाढलेली काळी दाढी, दोन्ही हात सरळ, दोन्ही पाय सरळ, उंची पाच फूट पाच इंच, अंगात काळी पॅन्ट असे आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कामोठे पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरिक्षक एम. डी. भोसले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## खारघर येथील कोपरा पुलाजवळ बस जळाली

### चालकाच्या प्रसंगावधानामुळे प्रवासी सुखरूप

**पनवेल : वार्ताहर**

सायन-पनवेल महामार्गावर खारघर येथील कोपरा पुलाजवळ टूर्स अँण्ड ट्रॅव्हल्सच्या खासगी बसला बुधवारी (दि. १५) रात्री उशीराच्या सुमारास अचानक आग लागली. चालकाने प्रसंगावधान दाखवत बस थांबवून प्रवाशांना वाहनाबाहेर काढल्याने मोठी जीवितहानी टळली. अग्निशमन विभागाने बसला लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवले.



ही बस मुंबईवरून साताऱ्यातील सांगोलाकडे जात होती. बसमध्ये एकूण १७ प्रवासी होते. ही बस सायन-पनवेल महामार्गांवरील कोपरा पुलावरून जात असताना अचानक इंजिनमधून ठिणग्या उडू लागल्या. बसचालकाने प्रसंगावधान राखून बस थांबवली, प्रवाशांना आपत्कालीन दरवाजामधून बाहेर काढले. इतक्यात बसने पेट घेतला, मात्र तोपर्यंत प्रवासी बसमधून उतरल्याने कुठलीही जिवीतहानी झाली नाही. या आगीत बस पुर्णपणे जळून खाक झाली आहे.







**खारघर :** श्री संत सेवालाल बहुउद्देशिय बंजारा समाज उन्नती मंडळाच्या वतीने जगद्गुरू संत सेवालाल महाराज यांच्या २८४व्या जयंतीनिमित्त सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, किरण पाटील, अमर उपाध्याय आदी उपस्थित होते. सर्वांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले.

## वीर वाजेकर महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

**उरण : वार्ताहर**

फुंडे महाविद्यालयात वीर वाजेकर पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ कवी व विचारवंत प्राध्यापक अशोक बागवे उपस्थित होते. त्यांच्या समवेत कवी नारायण लाळे, सतीश सोलापूरकर, कृष्णा कडू, सुधीर घरत, भूषण पाटील, उमेश म्हात्रे, शैलजा सुधीर घरत आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार यांनी आपल्या प्रस्ताविकातून वीर वाजेकर यांचे जीवनचरित्र व कार्याविषयी उल्लेख केला. कार्यक्रमाच्या कार्याध्यक्षा डॉ. झेलम झेंडे यांनी महाविद्यालयाच्या कार्याचे अहवाल वाचन केले.



सुधीर घरत यांनी या प्रदेशात राहणाऱ्या आगरी, कोळी, कराडी समाजाला ज्या व्यक्तीने एकत्र बांधून त्यांचे हक्क व अधिकार मिळवून दिले आणि सावकारी पाशातून मुक्त केले ते म्हणजे ८४ गावचे लोकमान्य लोकराजे वाजेकर यांच्या कार्याचा सतत स्मरण व्हायला हवे, असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कवी अशोक बागवे यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषेची आजची स्थिती गती आणि वास्तव्यावर मिशकल भाष्य केले. विनोदी भाषेशैलीतून विद्यार्थ्यांना खळखळून हसविले तसेच विचार करायलासुद्धा भाग पाडले.

या वेळी महाविद्यालयातील विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्या प्राध्यापकांचे विशेष सत्कार करण्यात आले. महाविद्यालयातील गुणवंत, क्रीडा, सांस्कृतिक, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देऊन सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमास तु. ह. वाजेकर विद्यालयातील सर्व सेवक व वीर वाजेकर कॉलेजचे सर्व सेवक व सुमारे ५०० विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सुजाता पाटील व डॉ. श्रेया राहुल पाटील यांनी केले. विद्यार्थी प्रतिनिधी जमकू चदाने, सचिव मयूर पाटील उपस्थित होते. कार्यालयीन प्रमुख बाळकृष्ण दगडे, अविनाश पाटील या सर्वांचे सहकार्य लाभले. प्राचार्य सुनीता वर्तक यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.



**पनवेल :** उमरोली ग्रामपंचायतीचे उपसरपंच रोशन शांताराम पोपेटा यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कृषी महोत्सवात दामोदर केणींना पुरस्कार




**उरण :** तालुका कृषी कार्यालयाचे कृषी सहाय्यक अधिकारी दामोदर तुकाराम केणी यांना कृषी विभागाच्या वतीने देण्यात येणारा २०२२-२३ चा उत्कृष्ट कर्मचारी अधिकारी पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

कामोठे येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा कृषी महोत्सवात जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. दामोदर केणी यांनी आपल्या ३९ वर्षाच्या कृषी सेवेत कृषी सहाय्यक अधिकारी म्हणून उत्तम कार्य केले. यात त्यांनी कृषी अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून, राज्यातील शेती उत्पादन बागांना भेटी देऊन, अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून, शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

## जासई कॉलेजमध्ये शुभचिंतन सोहळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील जुनिअर कॉलेजमध्ये इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा बुधवारी (दि. १५) झाला. प्राचार्य अरुण घाग यांनी मान्यवरांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले.

ज्युनिअर कॉलेजचे प्रा. अतुल पाटील, प्रमुख पाहुण्या स्नेहल पाटील, रयत सेवक बँकेचे संचालक किशोर पाटील तसेच विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून दिशा वारंगे यांनी मनोगत व्यक्त केले.

विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे, नरेश घरत, रघुनाथ ठाकूर, उपप्राचार्या एस. एस. पाटील, जुनिअर कॉलेज विभागप्रमुख एस. एस. शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक शिल्पा पाटील यांनी केले तर आभार प्रा. देवरे यांनी मानले.

### मान्यवरांकडून मार्गदर्शन

**कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष आणि भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील हे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी बारावीला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन यशस्वी होण्यासाठी जीवनात मेहनत, कष्ट केले पाहिजेत, असे सांगितले. प्रमुख वक्ते म्हणून जेएनपीटीचे असिस्टंट मॅनेजर पी. डी. पाटील होते. त्यांनी विद्यार्थ्यांना येत्या बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्मार्ट ध्येय ठेवा, सकारात्मक विचारसरणी ठेवा आणि ते पूर्ण करण्यासाठी राहिलेल्या दिवसात सोळा-सोळा तास अभ्यास करून आपले ध्येय पूर्ण करा, असा सल्ला दिला.**



## कळंबोलीतील नेत्र चिकित्सा शिबिराला प्रतिसाद

### खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**पनवेल : वार्ताहर**

खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त बाळासाहेबांची शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्यामार्फत मध्यवर्ती कार्यालय कळंबोली येथे गुरुवारी (दि. १६) मोफत नेत्र चिकित्सा व मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रामदास शेवाळे समाजकार्यात नेहमी अग्रेसर असतात. नुकताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवस आरोग्य शिबिर राबवून साजरा केला होता. त्याचप्रमाणे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या वाढदिवसानिमित्तही मोफत नेत्र चिकित्सा व मोफत चष्मे वाटप शिबिर राबविण्यात आले होते. या शिबिराला कळंबोली व परिसरातील शेकडो महिला व पुरूषांनी लाभ घेतला. शिबिरादरम्यान सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत १०० पेक्षा जास्त मोफत नेत्र चिकित्सा व मोफत चष्मे वाटप करण्यात आले.



या वेळी माजी नगरसेवक बबन मुकादम, उप महानगर संघटक आबासो लकडे, शहर प्रमुख तुकाराम सरक, रोडपाली शहर अध्यक्ष नारायण फडतरे, विभाग संघटक सुखदेव सस्ते रामदास शेवाळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत फाळके, संजय शेडगे, महेश गोडसे, निलेश दिसले, आनंदा माने, रणजित फडतरे, शुभम गोडसे, नारायण पिलाणे, विजय जाधव, गणेश कामटे, सुधीर ठोंबरे तसेच बाळासाहेबांच्या शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय

# निकालाच्या प्रतिक्षेत...

सर्वोच्च न्यायालय कायद्याच्या चौकटीत राहून निकाल देते. तेथे भावना आणि राजकीय मतांतरांना काही किंमत नसते. घटनेच्या चौकटीत राहूनच काय तो निकाल मिळेल यात शंका नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भारतीय जनता पक्षाच्या गोटात आत्मविश्वास दिसतो. तसा विरुद्ध गटात दिसत नाही हे मात्र खरे. कारण प्रचलित कायद्यांचा आणि घटनेतील तरतुदींचा पूर्ण अभ्यास केल्यानंतरच सात महिन्यांपूर्वी राजकीय उठाव झाला हे ध्यानी ठेवलेले बरे.

**गेले सुमारे सात महिने महाराष्ट्रात सुरू असलेली राजकीय चर्चा येत्या काही दिवसांतच संपुष्टात येईल अशी अपेक्षा आहे. अर्थात ती चर्चा जनसामान्यांच्या परिघात फारशी नाही कारण दैनंदिन जीवनात रोजीरोटीचे प्रश्न सोडवणाऱ्या सामान्य जनतेच्या दृष्टीने राजकारण हा काही काळ चघळण्यापुरता विषय असतो. बव्हंशी जनता राजकीय पेचप्रसंगांकडे तोंडी लावणे म्हणून पाहते. जनतेचा कौल मिळालेले मनासारखे सरकार सत्तेवर आले की सामान्य मतदाराची भूमिका संपते. सुदैवाने सध्या महाराष्ट्रात भारतीय जनता पक्ष आणि बाळासाहेबांची शिवसेना यांच्या युतीचे सरकार विराजमान झाले आहे. याच युतीला साडेतीन वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या मतदारांनी आपला कौल दिला होता, परंतु खुर्चीच्या मोहापायी महाविकास आघाडीचा अघोरी प्रयोग अडीच वर्षे जनतेच्या माथी मारला गेला. सुमारे सात-आठ महिन्यांपूर्वी शिवसेनेची उभी शकले झाली आणि त्यानंतर नवे सरकार स्थानापन्न झाले. हे सारेच प्रकरण निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात गेले. महाराष्ट्रात उभा राहिलेला घटनात्मक पेच सोडवण्याची जबाबदारी आता या दोन सर्वोच्च संस्थांवर आहे. विधानसभा उपाध्यक्षांना आमदारांना अपात्र ठरवता येते का, अविश्वास ठरावाची नोटीस मिळाल्यानंतर उपाध्यक्ष अशा प्रकारचा निर्णय घेऊ शकतात का, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेले नवे सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करेल की बरखास्त होईल, पक्षांतरबंदीचा कायदा उठाव करणाऱ्या शिवसेना आमदारांना लागू होतो का अशा प्रकारचे अनेक प्रश्नांचे जंजाळ सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठासमोर सोडवणुकीसाठी आले आहे. हे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी पाच सदस्यांचे नव्हे तर सात सदस्यीय मोठे घटनापीठ असायला हवे अशीही मागणी याचिकेद्वारे उद्धव ठाकरे गटाने केली आहे. तो प्रश्नदेखील सोडवावा लागणार आहे. गेले दोन दिवस बाळासाहेबांची शिवसेना, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे दोन राजकीय पक्ष आणि माननीय राज्यपालांची बाजू मांडणारे युक्तिवाद चालू होते. गेले तीन दिवस महाराष्ट्रातील राजकीय पेचप्रसंगाबाबतची सुनावणी सलगपणे सुरू होती. बाळासाहेबांच्या शिवसेनेतर्फे नामवंत वकील हरीश साळवे आणि नीरज कौल यांनी युक्तिवाद केले तर उद्धव ठाकरे गटाच्या वतीने प्रसिद्ध वकील व काँग्रेसचे माजी खासदार कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु संघवी आदींनी बाजू मांडली. सर्व बाजू ऐकल्यानंतर घटनापीठाने निर्णय राखून ठेवला आहे. हा निकाल कधीही लागू शकेल. राखून ठेवलेला निकाल नेमका कधी लागेल हे सांगणे अवघड असल्याने राजकीय चर्चांना पेव फुटले आहे. नेहमीप्रमाणे ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी काही मुक्ताफळे उधळत शिंदे समर्थकांवर टीका केली. तशाच प्रकारचे उत्तर शिंदे गटाकडून दिले गेले. अंतिम निकाल लागेपर्यंत हा कलगीतुरा सामान्य जनतेला सहन करावा लागणार आहे.**

# अलिबाग शहरात कचरा जाळल्याने धुराचे साम्राज्य



## खबरबात
प्रकाश सोनवडेकर

अलिबाग नगर परिषदेच्या डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याला आग लागल्यामुळे गेले तीन दिवस अलिबाग शहरात धुराचे साम्राज्य आहे. या धुरामुळे अनेकांना श्वसनाचे आजार होत आहेत. ही आग लागली की लागवली याचा शोध घ्यायलाच हवा. प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई व्हायल हवी. त्याचबरोबर अलिबाग शहराच्या डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्नदेखील कायमचा सोडविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

अलिबाग शहरात गोविंदबंदर येथे डम्पिंग ग्राऊंड आहे. येथे अलिबाग शहरात जमा केलेला कचरा टाकला जातो. त्याचबरोबर लगतच्या ग्रामपंचायतीमधील कचरादेखील येथेच टाकला जातो. वास्तविक या घनकचऱ्याची विल्हेवाट नागरी घनकचरा अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पद्धतीने करणे बंधनकारक आहे, असे आताना हा घनकचरा जाळून त्याची विल्हेवाट लावली जाते. या कचऱ्याला १५ दिवसांनी अशाच प्रकारे आग लावली जाते ही वस्तूस्थिती आहे. या आगीतून धूर निघत असतो, परंतु या वेळी लागलेल्या (की लावलेल्या) आगीतून मोठ्या प्रमाणावर धूर निघाला तो संपूर्ण शहरात पसरला. ही आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाला पाचारण करावे लागले. आग विझली तरी तीन दिवस ही आग धुमसत होती. या धुरामुळे अलिबागकरांचा श्वास कोंडला गेला. वास्तविक शहरातील कचरा उचलण्याचा ठेका देण्यात आला आहे. त्याची विल्हेवाटदेखील लावायची आहे. तसे न करता हा कचरा जाळण्यात येतो. याच्या धुरामुळे आसपासच्या परिसरातील लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. हे आगीचे प्रकार थांबविण्यासाठी पालिकेने उपाययोजना करायला हवी.

अलिबाग नगरपालिकेकडून रस्ते सफाई करणे व घरोघरी घंटागाडीद्वारे कचरा संकलन करणे, कचरा डम्पिंग ग्राऊंडवर नेवून टाकणे व मृत जनावरांची विल्हेवाट लावणे, वेणणी काढणे, माती उचलणे इत्यादी कामासाठी, सहा कोटी ७३ लाख २४ हजार ७२० रुपये इतकी रक्कम या कंत्राटदारांना नगर परिषदेने अदा केली आहे. सहा कोटी ७३ लाख २४ हजार ७२० इतकी रक्कम या कंत्राटदारांना आदा करूनही कचऱ्याला आग लागून जनतेचे आरोग्य धोक्यात येत आहे.

पालिकेला घनकचरा प्रकल्पासाठी जागाच उपलब्ध होत नसल्याने दिवसेंदिवस या डम्पिंग ग्राऊंडमधील कचऱ्याचे साम्राज्य वाढतच चालले आहे. शहरात दरदिवशी कित्येक टन कचरा निघतो. तो या डम्पिंग ग्राउंडवर टाकला जातो. डम्पिंग ग्राऊंडमधील कचऱ्याला वारंवार आग लागते. ती आग अनेक दिवस धुमसत राहते. यामुळे परिसरात धुराचे साम्राज्य पसरते. या प्रदूषणकारी धुरामुळे गोविंद बंदर येथील नागरिक हैराण होतेच, पण आता पूर्ण अलिबाग शहरात या कचऱ्याचा धुर पसरू लागला आहे. वयोवृद्ध आणि बालकांना खोकला, दम्यासारखे आजार होऊ लागले आहेत.



अलिबाग नगर परिषद हद्दीतून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट नागरी घनकचरा अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार शास्त्रोक्त पद्धतीने करणे बंधनकारक आहे. त्यामुळे अलिबाग नगरपालिकेने तातडीने अशात्रोक्त पद्धतीने घनकचऱ्याची विल्हेवाट करणे बंद करावे, असे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी रायगड-२ यांनी मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांना दिले आहेत. त्याची अंमलबाजावणी काटेकोरपणे केली पाहिजे. अलिबाग नगरपालिका दरवर्षी कचरा व्यवस्थापनासाठी साडे सहारोटी रुपयांचा खर्च करते. कचरा व्यवस्थापनासाठी येवढा निधी खर्च करूनही जर आग लागून कचऱ्याची विल्हेवाट लावली जात असेल आणि जनतेचे आरोग्य धोक्यात येत आहे ही खेदजनक बाब आहे. या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई व्हायला हवी.

अलिबाग शहरातील डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याला लावण्यात येणाऱ्या आगीमुळे जा धुर पसरतो तो दम्याच्या रुग्णांसाठी अतिशय त्रासदायक असतो. लहान मुलांनाही या धुराचा प्रचंड त्रास होतो. सर्दी-खोकल्याचा त्रास अधिकच बळावू शकतो. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने हिवाळ्यात कचरा जाळण्याचे प्रकार थांबवायला हवेत, असे मत डॉक्टरांनी व्यक्त केले आहे. शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट न लावता कचऱ्याला आग लावून अलिबागकरांच्या आरोग्याशी का खेळता, हे प्रकार थांबवले पाहिजेत.

अलिबाग, उरण, मुरूड आणि श्रीवर्धन तालुक्यातील समुद्र किनाऱ्यांवर असलेल्या ग्रामपंचायतीकडे स्वत:ची डम्पिंग ग्राऊंड उपलब्ध नाही. त्यामुळे अनेक कचरा किनारपट्टीवर मोकळ्या जागेत टाकतात; अन्यथा हा कचरा कांदळवन क्षेत्रात टाकला जातो. सिआरझेड कायद्यामुळे डम्पिंग ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध होत नाही. आता कांदळवनक्षेत्रही वनविभागाच्या अखत्यारीत गेल्याने त्या जागाही उपलब्ध होण्यास अडसर निर्माण होत आहे. त्यामुळे मिळेल त्याजागेवर कचरा टाकण्याचे प्रकार घडत आहेत. या समस्येवर तोडगा काढायचा असेल तर गाव तिथे डम्पिंग ग्राऊंड, गाव तिथे घंटागाडी या सारख्या योजना राबवाव्या लागणार आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावाल लागेल.




## पेटीएमचे ‘हे’ फीचर; पेमेंट करणे होणार सोपे




पेटीएम पेमेंट्स बँक लिमिटेड (पीपीबीएल)ने आपल्या ग्राहकांसाठी नवीन आणि फास्ट अशी सर्व्हिस लॉन्च केली आहे. पेटीएम हे एक ऑनलाईन व्यवहार करण्याचे माध्यम आहे. यावरून तुम्ही रिचार्ज, गॅस बुकिंग, फास्टटॅग आणि अशी अन्य काम यावरून करू शकता. तर पेटीएमने जी फास्ट सर्व्हिस लॉन्च केली आहे त्याबद्दल आपण अधिक माहिती जाणून घेऊयात.

पेटीएम पेमेंट्स बँक लिमिटेड ने आपल्या ग्राहकांसाठी UPI Lite ही फास्ट सर्व्हिस लॉन्च केली आहे. या फीचरमुळे वापरकर्ते पिनशिवाय लहान लहान किमतीच्या युपीआय व्यवहार करण्यासाठी परवानगी देणार आहे. यासह वापरकर्ते पेटीएम लाईट सेवेसह एका क्लिकवर पेमेंट करू शकणार आहेत. तेच रिअल टाइम पेमेंट करू शकणार आहेत.

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) द्वारे हे युपीआय लाईट डिझाईन करण्यात आले आहे. युपीआय लाईट आरबीआयने सप्टेंबर २०२२ मध्ये लॉन्च केले होते. नवीन उपक्रमाला चालना देण्यासाठी पेटीएम बँकेने सांगितले की, अशा प्रकारची युपीआय लाईट सर्व्हिस सुरू करणारी पहिली पेमेंट बँक आहे.

पेटीएम म्हणाले की, UPI Lite हे फीचर थेट वापरता येते. ही सेवा नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने लहान लहान व्यवहारांसाठी सक्षम केली आहे. नवीन सर्व्हिस मदतीने एका क्लिकवर फास्ट पेमेंट करता येणार आहे. कंपनी देशभरात डिजिटल पेमेंटचा वापर वाढवण्याच्या दिशेने काम करत आहे.

पेटीएमच्या नवीन सर्व्हिसच्या मदतीने वापरकर्ते एकाचवेळी २०० रुपयांपर्यंत पेमेंट करू शकतात. तर वापरकर्ते पेटीएम लाईट वॉलेट मी दोन वेळा २००० रुपये हणजे जास्तीत जास्त ४००० अॅड करता येतील. या फीचरमुळे वापरकर्ते पिन न टाकतासुद्धा पेमेंट करू शकणार आहेत.

# कवी, कादंबरीकार नाटककार, समीक्षक पुरुषोत्तम रेगे



## निमित्त

श्रेष्ठ मराठी कवी, तसेच कादंबरीकार नाटककार, समीक्षक व संपादक पुरुषोत्तम शिवराम रेगे यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

पुरुषोत्तम शिवराम रेगे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मिठबाब येथे झाला. शिक्षण मुंबई व लंडन येथे बी.ए. व बी.एस्सी. पर्यंत. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून त्यांनी बी.एस्सी. ही पदवी मिळविली होती. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून विविध महाविद्यालयांतून त्यांनी काम केले. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले. ‘सुहृद चंपा’ आणि ‘रूप कथ्थक’ ही दोन टोपण नावे त्यांनी अनुक्रमे साधना आणि इतर कविता (१९३१) यातील कवितांसाठी तर ‘रूपकथ्थक’ हे टोपण नाव रंगपांचालिक आणि दोन नाटके (१९५८) या पुस्तकासाठी घेतली होती. त्यांचे अन्य साहित्य पु.शि. रेगे या नावानेच प्रसिद्ध झाले. उदा. छांदसी नावाचा त्यांचा १९६२ साली प्रसिद्ध झालेला समीक्षात्मक लेखांचा संग्रह.

साधना आणि इतर कविता ह्या त्यांच्या काव्यसंग्रहानंतर फुलोरा (१९३७), हिमसेक (१९४३), दोला (१९५०), गंधरेखा (१९५३), पुष्कळा (१९६०), दुसरा पक्षी (१९६६) आणि प्रियाळ (१९७२) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कवितांची इंग्रजी, जर्मन, डॅनिश, स्पॅनिश व चिनी भाषांत भाषांतरे झाली आहेत. कारण त्यांत भारतीय परंपरेतून आलेली स्त्रीविषयक जाणीव आणि या जाणिवेवर झालेले आधुनिकतेचे संस्कार यांचा एक हृद्य मेळ आढळतो. सावित्री (१९६२), अवलोकिता (१९६४), रेणू (१९७३) आणि मातृका (१९७८) या रेगे यांच्या चारी कादंबऱ्या काव्यात्म व अर्थगर्भ आहेत. त्यांतील भावविश्व गूढ, तत्वस्पर्शी, सखोल व समृद्ध आहे. सावित्री ही पत्ररूप कादंबरी असून सावित्री आणि अवलोकिता या कांदबऱ्या परस्परांना पूरक ठरतील अशा स्वरूपाच्या आहेत. रेणू आणि मातृका त्याहून वेगळ्या आहेत. त्यामधूनही त्यांच्या कविमनाचे स्त्रीत्वाविषयीचे आकर्षण प्रकट झाले आहे.

रंगपांचालिक आणि दोन नाटके या त्यांच्या संग्रहात ‘माधवी : एक देणे’, ‘रंगपांचालिक’ व ‘कालयवन’ अशी तीन छोटी नाटके समाविष्ट झाली आहेत. रेगे यांच्या या नाटकांनाही काव्याची मिताक्षरी अर्थगर्भता लाभलेली असून चित्रमयता, श्रवणसुभगता आणि चिंतनप्रेरकता ही त्यांच्या नाटकांची वैशिष्ट्ये आहेत. या नाटकांची त्यांनीच हिंदीत भाषांतरे केली आहेत. पालक (१९७५), मध्यंतर (१९७६) व चित्रकामारव्यम् (१९७७) ही त्यांची छोटी नाटकेही नियतकालिकांतून प्रसिद्ध झाली आहेत.

या साहित्याखेरीज त्यांनी काही शैक्षणिक पुस्तकेही लिहिली आहेत. छंद या द्वैमासिकाचे संपादन ही रेगे यांची आणखी एक महत्वपूर्ण लक्षणीय कामगिरी. भाषा, कला व साहित्य या विषयांना वाहिलेले हे एक वाङ्मयीन नियतकालिक. मराठीतील वाङ्मयीन नियतकालिकांच्या परंपरेत महत्वाची भर घालणारे. १९५४ मध्ये काही समानधर्मीयांच्या सहकार्याने त्यांनी ते सुरू केले. १९६० साली ते त्यांनी बंद केले. रेगे यांनी छंदमध्ये विपुल लेखन तर केलेच पण त्याची संपादकीय व्यावहारिक व आर्थिक बाजूही आस्थेने संभाळली. ते सरकारी नोकरीत असल्याने छंदवर संपादिका म्हणून त्यांच्या पत्नीचे, सरिता रेगे यांचे नाव छापलेले असे.

रेगे यांना १९६५ मध्ये रशियाचा प्रवास करण्याची संधी लाभली. मॉस्को येथे लघुकथा या विषयावर आयोजित केलेल्या परिसंवादात एक भारतीय प्रतिनिधी म्हणून त्यांनी भाग घेतला. १९६५ मध्ये केरळ येथे झालेल्या अखिल भारतीय लेखक परिषदेचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले. १९६९ सालच्या वर्धा येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मुंबई येथे त्यांचे निधन झाले.

**(साभार : विश्वकोष मराठी)**

## क्लिक...क्लिक...!




**पनवेल : शिवजयंतीजवळ आल्याने शहरातून जाणाऱ्या महामार्गावर शिवरायांचे सिंहासनावर बसलेले, अर्धपुतळा व अश्वारूढ अशा विविध प्रकारचे व विविध आकारातील पुतळे विक्रीस दिसत आहेत.** (छाया : नितीन देशमुख)

## आरोग्य प्रहर

# वयाच्या ६० वर्षांनंतर महिलांनी आरोग्याची अशी घ्यावी काळजी

वयाच्या साठाव्या वर्षांनंतर बहुतांश महिलांना आरोग्यासंबंधी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.



अशा स्थितीत स्त्रिया आपले आरोग्य योग्य ठेवण्यासाठी औषधांवर अवलंबून असतात. जर तुमचे वय ६० वर्षांपेक्षा जास्त असेल, तर काही सोप्या टिप्स फॉलो करून तुम्ही केवळ तुमच्या आरोग्याची विशेष काळजी घेऊ शकत नाही, तर तुमचे आरोग्य आणि मेंटली स्ट्रॉन्ग बनवू शकता.

**मेंदूचा व्यायाम करा –** ६० वर्षांनंतरही मन तीक्ष्ण आणि सक्रिय ठेवण्यासाठी तुम्ही मेंदूचे व्यायाम करू शकता. अशा परिस्थितीत, शक्य तितके आपले मन व्यस्त ठेवण्याचा प्रयत्न करा. यासाठी तुम्ही कोडी सोडवणे, नवीन छंद आजमावणे, नवीन भाषा शिकणे आणि साहसी गोष्टी करणे अशा काही पद्धतींची मदत घेऊ शकता.

**वर्कआउट करू शकता –** साठ वर्षांनंतर शरीरातील स्नायू आकुंचन पावू लागतात, त्यामुळे महिलांना पाठदुखी, गुडघेदुखी आणि इतर सांधेदुखीचा त्रास होऊ शकतो. अशा परिस्थितीत, स्नायूंना बळकट करण्यासाठी तुम्ही दररोज शारीरिक व्यायाम किंवा वर्कआउट करून पाहू शकता. यामुळे तुम्ही ६० नंतरही तंदुरुस्त आणि निरोगी राहाल.

**धूम्रपान करणे टाळा –** काही महिलांना धूम्रपान किंवा तंबाखू खाण्याची सवय असते, परंतु वयाच्या ६० नंतर धूम्रपान केल्याने हृदयरोग किंवा कर्करोग होण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत, ६० नंतरही निरोगी राहण्यासाठी धूम्रपान किंवा धूम्रपानाचे व्यसन सोडणे चांगले.

**स्क्रीनिंग चाचणी करावी –** वयाच्या ६५ व्या वर्षी महिलांची हाडांची घनता कमी होऊ लागते. अशा परिस्थितीत महिलांची हाडे कमकुवत होण्याची भीती तर असतेच, पण तुम्हाला स्तनाचा कर्करोगही होऊ शकतो. म्हणूनच ६० वर्षांनंतर महिलांना नियमित तपासणी आणि तपासणी करणे आवश्यक होते.

**वॅक्सिन घेणे विसरू नका –** साठ वर्षांनंतर शरीराची प्रतिकारशक्ती वीक होऊ लागते. अशा परिस्थितीत डॉक्टरांच्या सल्ल्याने आवश्यक लस घेऊन शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवता येते. यासोबतच, लसीच्या मदतीने तुम्ही अनेक गंभीर आजारांना सहज पराभूत करू शकता.

निवडक



## रायगड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन पुस्तिकेचे प्रकाशन

**अलिबाग :** रायगड जिल्ह्याचे सन २०२२ चे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन या पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, सांख्यिकी कार्यालयाच्या उपसंचालक वृषाली माकर, सांख्यिकी अधिकारी प्रितम ईश्वरे, सहाय्यक संशोधन अधिकारी नसिरा पठाण, सांख्यिकी सहाय्यक दिप्ती पांडे, पल्लवी फालक व अंकुर जाधव उपस्थित होते.

## चौक येथून कामगार बेपत्ता

**चौक :** खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चौक



हद्दितील नविन वसाहतमधील विजय रघुनाथ पवार (वय, ३५) हा वीटभट्टी कामगार १ फेब्रुवारी २०२३ रोजी घरातून निघून वीटभट्टी मालक यांच्याकडून पगार आणण्यासाठी जातो म्हणून सांगून गेला. तो आजपर्यंत घरी परत न आल्याने त्याच्या पत्नीने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पाच फूट दोन इंच उंची असणारा व्यक्ती सावळ्या रंगाचा आहे. काळे कुरळे केस, लांबट चेहरा, बारीक दाढी मिशी, सरळ नाक, काळे डोळे असून अंगकाठी सडपातळ बांधा अशी आहे. ही व्यक्ती कुणास आढळल्यास ०२१९२-२७५०३३ अथवा तपास अंमलदार एन. बी. सावरटकर (पोना. २३६५) ७३५०२२१९९९ यांच्याशी संपर्क साधावा असे खालापूर पोलीस यांच्याकडून आवाहन करण्यात आले आहे.

## नागोठणेतून सलून व्यावसायिक बेपत्ता

**नागोठणे :** नागोठणे पोलीस स्टेशन हद्दीतील नागोठणे जोगेश्वरी नगर, तालुका रोहा येथील रहिवाशी नागोठणे खुमाचा परिसरात सलुन व्यावसाय करणारे राकेश अशोक शिर्के, वय ४० वर्षे हे १४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडे दहा वाजण्याच्या सुमारास आपल्या घरातील कोणासही काही एक न सांगता निघून गेले. यावेळी राकेश हे दुसऱ्या दिवशीही घरी परतले नाहीत. यासंदर्भात राकेश शिर्के हे मिसिंग झाल्याची तक्रार १५ रोजी नागोठणे पोलीस ठाणे येथे त्यांची पत्नी रुपाली राकेश शिर्के यांनी दिली. नागोठणे पोलीस ठाण्यात म.मी.र.नं. ०१/२३ अन्वये दाखल करण्यात आली असून पोलीस निरीक्षक राजन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस राकेश शिर्के यांचा सर्वत्र शोध घेत आहेत.

# रताळ्याला महागाईचे ग्रहण

## महाशिवरात्रीपूर्वी सजला बाजार; खरेदीसाठी गर्दी

**मुरुड : प्रतिनिधी**

महाशिवरात्रीचा सण सर्वत्र अत्यंत धार्मिकतेने मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. यंदा महाशिवरात्री शनिवार (दि. १८ फेब्रुवारी) आहे. महाशिवरात्रीच्या तीन दिवस मुरुड शहराच्या मध्यभागी असणाऱ्या भाजी मार्केट शेजारीच रताळे बाजार भरला जातो. विविध प्रकारची रताळी येथे विक्रीस येतात. दरवर्षी या बाजारातून हजारो किलो रताळी विकली जाऊन गरीब शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा व्यवसाय मिळत असतो.



महाशिवरात्रीला हिंदुधर्मीयांमध्ये बहुतांशी लोक उपवास करतात. उपवासासाठी लागणारी रताळी मात्र मुरुड तालुक्यांतील कोर्लई गावातून मुरुडच्या बाजारात मोठ्या प्रमाणावर दर वर्षी विक्रीसाठी आणली जातात. मात्र यंदा पाऊस अधिक पडल्याने रताळ्याचे पीक कमी आल्याने रताळी उत्पादन घटले आहे. यंदा पाऊस हा अवकाळी सुद्धा पडला त्यामुळे जमिनीत ओलावा खूप राहिला याचा परिणाम मात्र रताळी पिकास बसला आहे. रताळी पिकासाठी जमीन सुकी असावी लागते.परंतु यंदाच्या पावसाने मोठे नुकसान केले आहे.शिवाय महाशिवरात्रीचा सण हा खूप लवकर आला त्यामुळे पीक तयार होण्यास अवधी मिळाला नाही याचा परिणाम उत्पादनावर होऊन खूप कमी उत्पादन रताळ्याचे आल्याचे दिसून येत आहे.

कोकण किनारपट्टीवर पोर्तुगिजांचे वंशज हे पारंपारिक पद्धतीने मळे पिकवितात. उल्लेखनीय बाब अशी की , रताळ्यांची उलाढाल सर्वाधिक मुरुड ला होत असते. यंदा बाजारात महिला विक्रेत्यांची संख्या कमी दिसून येत आहे. नोव्हेंबरमध्ये रताळ्याची लागवड केली जाते. साधारणतः अडीच महिन्यांचे हे पीक असते. या वर्षी पावसाचे प्रमाण अधिक असल्याने जमिन ओली असल्याने लागवडीसाठी उशीर झाला. या शिवाय दहा दिवस महाशिवरात्र आधी आली.

कोर्लईची गावठी जातीच्या रताळ्याचे वाण रंगाने लाल चुटूक व खायला अत्यंत चविष्ट लागते त्यामुळे बाजारात या रताळ्यांना मोठी मागणी असते. सर्व धर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता मुरुड च्या रताळी बाजारात दिसून येते. हिंदु स्त्री-पुरुषाच्या बरोबरीने मुस्लीम स्त्री पुरुष रताळी बाजारात गर्दी करताना दिसता. रताळ्याचे उत्पादन घटल्याने यंदा प्रति किलो लहान आकाराचे ५० रु. तर मोठ्या आकाराचे रताळे ६० रु.दराने विक्री होत आहे.

रताळी लागवडीच्या वेळेस पावसाने उघाडी न दिल्याने रताळी महाशिवरात्रीला अधिक प्रमाणात तयार झाली नाहीत त्यामुळे बाजारात आवक घटल्याचे महिला बचत गट प्रमुख अंजलीन लुबीन डिसोजा यांनी सांगितले.

### ग्राहकांकडून घासाघीस

ग्रामीण भागातील ग्राहकांकडुन बाजारात घासाघिस चालते परंतु विक्री कलेत निपुण असलेल्या फिरंगिणी महिला स्वभावाने मृदू व गोड असल्यामुळे ग्राहकांना फिक्स दराने खरेदी करावी लागते. या रताळे बाजारात खरेदी हा आगळा आनंद असतो. गतवर्षी साधारण ७० ते ७५ महिला विक्रेतीकडे ५ ते ६ क्विंटल रताळी होती. या वर्षी ३५ ते ४० महिलांकडे ३ ते ४ क्विंटल रताळी विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे मारिना मार्तीस यांनी सांगितले.

## खोपोली, भिवपुरी रोड, शेलू रेल्वे स्थानकावर पोलीस चौकीची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई - खोपोली दरम्यानच्या कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत येणाऱ्या स्थानकांवर पोलीस चौकी उभारण्यासाठी निधी मिळावा. यासाठी पोलीस निरीक्षकांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्याशी चर्चा करून मागणीचे निवेदन दिले.

कर्जत विधानसभा मतदार संघातील खोपोली, भिवपुरी रोड, शेलू या रेल्वे स्थानकांवर बंदोबस्तासाठी पोलीस कर्मचारी २४ तास उपस्थित असतात. परंतु या रेल्वे स्थानकांवर पोलीसांसाठी बसण्याची सोय किंवा जेवण किंवा कपडे बदलण्या साठी पोलीस चौकी नसल्या कारणाने पोलिस कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे.

विशेषतः महिला पोलीस कर्मचाऱ्यांना मोठी अडचण होत आहे. या सर्वांना चौकी नसल्याने २४ तास उभे राहून काम करावे लागत आहे.

त्यांची गैरसोय दूर व्हावी म्हणून या रेल्वे स्थानकांवर पोलीस चौकी उभारावी. अशी मागणी पोलीस कर्मचाऱ्यांची होती.

अर्जदार तर्फे वकील श्री. नंदु म्हात्रे

### जाहीर नोटीस

### पनवेल येथील मे. जिल्हा न्यायाधिश रायगड साहेब यांचे कोर्टात...

दिवाणी चौकशी अर्ज नं. ९१/२०२२
नि.७/ड

श्रीमती. मयुरी महेश मणेर ................ **अर्जदार**
व इतर
रा. धामणी, ता. खालापुर, जि. रायगड
**विरुद्ध**
कुणीही नाही ............................... **सामनेवाला**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्रीमती. मयुरी महेश मणेर यांनी पनवेल येथील न्यायालयात कु. यश महेश मणेर, कु. नैतिक महेश मणेर, कु. मनवा महेश मणेर यांचे गार्डीयन्स म्हणुन नेमणुक करुन मिळणेकरीता दिवाणी चौकशी अर्ज नं. ९१/२०२२ हा दाखल केला आहे. सदरील मौजे धामणी ता. खालापुर येथील सर्व्हे नं. ४८/१/अ क्षेत्र हे. आर. पॉ. ०-१६ ८० पैकी कै. महेश विलास मणेर यांच्या हिश्याचे क्षेत्र हे. आर. ०-०४-२० मध्ये त्यांचे कायदेशिर वारस म्हणुन श्रीमती. मयुरी महेश मणेर, कु. यश महेश मणेर, कु. नैतिक महेश मणेर, कु. मनवा महेश मणेर असे असुन सदर मिळकतीबाबत अज्ञान मुले कु. यश महेश मणेर, कु. नैतिक महेश मणेर, कु. मनवा महेश मणेर यांच्या लिगल गार्डीयन म्हणुन आई श्रीमती. मयुरी महेश मणेर हिची नेमणुक होणेकरीता व त्या मिळकतीच्या हस्तांतरणाकरीता मे. कोर्टाकडुन आदेश होणे आवश्यक झाले आहे. तरी सदरील कु. यश महेश मणेर, कु. नैतिक महेश मणेर, कु. मनवा महेश मणेर यांचे सदरहु मिळकतीबाबत गार्डीयन्स म्हणुन आई श्रीमती. मयुरी महेश मणेर हिची नेमणुकीबाबत अन्य कुणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १ महिन्याच्या आत सदरील चौकशी अर्जात कागदपत्रांसहीत दाखल करावी. सदरचे मुदतीत कुणाचीही हरकत न आल्यास कु. यश महेश मणेर, कु. नैतिक महेश मणेर, कु. मनवा महेश मणेर यांचे गार्डीयन्स म्हणुन श्रीमती. मयुरी महेश मणेर यांची नेमणुक करण्यात येईल.

आज दि. ०८ माहे फेब्रुवारी २०२३ रोजी माझे सही व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**सही/-**
लिपीकाची सही

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
नाझर
मे. जिल्हा न्यायाधिश पनवेल

## उसरोली टेप रस्ता मजबुतीकरणाची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

उसरोली गाव ते उसरोली टेप या पट्ट्यात रस्त्यालगत नदी वाहते तसेच समुद्राची खाडी असल्याने येथे पाण्याचा निचरा होत नाही. परिणामतः पाऊस जास्त पडल्यास सर्व पाणी रस्त्यावर येऊन रस्ता लवकर खराब होतो. यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने हा रस्ता मजबुतीकरण करून या रस्त्याची उंची वाढवावी अशी मागणी निवेदनाद्वारे उसरोली सरपंच मनीष नांदगावकर यांनी यांच्याकडे बांधकाम खात्याचे रोहा येथील उप अभियंता यांच्याकडे केली आहे.

उसरोली येथील रस्ता हा रोहा उप अभियंता यांच्याकडे वर्ग केलेला आहे. तसेच हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ शी जोडलेला आहे. हा रस्ता हा दहा गावांना जोडलेला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक जोडली गेली आहे. कित्येक वर्ष या रस्त्याचे मजबुतीकरण केलेले नाही. त्यामुळे रस्ता लवकर करून मिळावा अशी मागणी सरपंच नांदगावकर यांनी केली आहे. १२ जुलै २०२१ च्या मोठ्या प्रलयी पावसामुळे या रस्त्यावर पाच फूट पाणी जमा झाले होते. यावेळी दहा गावांचा संपर्क तुटून पाण्याचा निचरा होण्यास किमान दोन दिवस गेल्याने येथील वाहतूक बंद होती.

# वावोशीत विद्यार्थ्यांना दिले स्वसंरक्षणाचे धडे

**खोपोली : प्रतिनिधी**

श्री छत्रपती विद्यालय व ज्युनीयर कॉलेज वावोशी येथे गुरुवारी खालापूर पोलीस ठाणे व टाटा स्टील फाउंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने स्व संरक्षण मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमा दरम्यान मपोसई सरला काळे व मपोना लतिका गुरव यांनी हायस्कूलचे मुलींना बडी कॉप, पोलीस काका, दामीनीपथक, डायल ११२ बाबत माहीती दिली. तसेच महिला अत्याचार, बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार, 'गुड टच बॅड टच' याबाबत मार्गदर्शन करून सायबर जनजागृती केली.

पोलीस ठाणेकडील महिला पोलीस अंमलदार, पोलीस दिदि/बडी कॉप यांचे नाव व संपर्क क्रमांक देण्यात आले. त्याचबरोबर तपस्वी गोंधळी कराटे प्रशिक्षक, राष्ट्रीय युवा पुरस्कार्थी यांचेकडुन मुलींना प्रात्यक्षिकाव्दारे कराटे व स्व संरक्षणाचे धडे देण्यात आले. स्वसंरक्षण मार्गदर्शन शिबीराकरीता टाटा स्टील फाउंडेशने सहकार्य केले.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ८१ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोतुर्डे आदिवासीकडून नेराव कडे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ५४६३६३० | ५५००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | खुटील ते आदे फाटा येथील रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ४०४०९४६ | ४१००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ३ | म्होप्रे कोकरे नाते नांदगाव रस्ता प्र.जि.मा. ९२ कि.मी. ५/४०० मध्ये पूलाच्या जोडरस्त्याचे व पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४, ०४)** | ४००६६२९ | ४१००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ४ | भोराव सवाद धारवली रस्ता प्र.जि.मा. ६५ कि.मी. ६/४०० मधील पुलाची दुरूस्ती करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. **(३०५४, ०४)** | ३७४५६९१ | ३८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ५ | मौजे नेराव चाचखोंडा येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२५१५) | २४२९१०४ | २५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ६ | मोरगिरी फौजदारी ते धनगरवाडी रस्ता ग्रा.मा. ८१ कि.मी. ०/०० ते २/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. **(५०५४, ०४)** | ३०००४३६ | ३१००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ७ | आंबेशिवथर ते आंबेनळी रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. **(२५१५)** | २२३८९४० | २३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ८ | रायगड रोडपासुन ते काचले गाव येथे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(२५१५)** | २२४३१९० | २३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ९ | वीर टोळ आंबेत रा. ता. १०० कि.मी. ०/२०० (प्रत्यक्ष ०/५००) मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३)** | २१०१२८० | २२००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १० | ढालघर लोणशी उनेगांव गोरेगांव रस्ता प्र.जि.मा. ८६ कि.मी. ६/१०० ते ६/२०० मध्ये संरक्षक भिंत बांधणे.तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(पुरहानी दुरुस्ती)** | १६४६२१६ | १७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ११ | बारसगांव शिवथर रस्ता प्र.जि.मा. ७० कि.मी. १३/४०० मध्ये कॉंक्रीट गटाराचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(पुरहानी दुरुस्ती)** | १६६३७८८ | १७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १२ | मौजे दहिवली अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड **(२५१५)** | २४४६२४५ | २५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १३ | मोजे दहिवली अंतर्गत रस्ता कॉंक्रिटिकरण तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२५१५)** | १६२८८८५ | १७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १४ | मौजे चिंचवली सोन्याचीवाडी येथे रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२५१५)** | १६२३०११ | १७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १५ | मौजे वरंडोली येथे रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. **(२५१५)** | १६१२२९२ | १७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १६ | मौजे शेवते येथील रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(२५१५)** | १२१०११५ | १३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| १७ | मौजे चिंचवली स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२५१५)** | १२१८९९७ | १३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| १८ | मौजे वडघर हनुमान मंदिराकडे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२५१५)** | १२१७०३४ | १३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| १९ | तुडील भेलोशी मंडणगड रस्ता प्र.जि.मा. ६५ कि.मी. ६/१०० ते ६/३०० मध्ये क्रॅश बॅरिअरचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम ससन २०२२-२३)** | १६८७४१४ | १७००० | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| २० | तुडील मेलोशी मंडणगड रस्ता प्र.जि.मा. ६५ कि.मी. ०/०० ते ०/०५० मध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२२-२३)** | १६६५५४६ | १७००० | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| २१ | मौजे मढ़ेगांव कोंड ता. माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(आ.स्था. वि.)** | १२६५७७५ | सु.बे.अ. | ५९०/- | ३ महिने | सु.बे.अ. |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२२/०२/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०१/०३/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक **०३/०३/२०२३** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/६७१**
**दिनांक : १५/०२/२०२३**



**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ८० सन २०२२-२३**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो. ता. महाड, जिल्हा रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ - २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना **दिनांक २०/०२/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २७/०२/२०२३ रोजी १८.०० वाजेपर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक २८/०२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर करावयात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक २८/०२/२०२३ रोजी ११.०० वाजता उघडतील.** निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.पं. महागांव मौजे निगुडशेत येथे स्मशनाकडे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ८१६३०९ | ९०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | ग्रा.पं. गिरणे मौजे मालाठे येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ४०७९८३ | ५०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ३ | ग्रा.पं. वांजळोशी मौजे वांजळोशी येथे मेन रोड ते स्मशानाकडे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ८१६२९५ | ९०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | मौजे गोंडाळे गवळवाडी ता. महाड येथे सभामंडप बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(आ. स्था. वि.)** | ७१२९४५ | ८०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | मौजे शेलटोली ता. महाड येथे सभामंडप बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(आ. स्था.वि.)** | ८८७२२४ | ९०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | मांडला आंबेत विर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. १०/६०० मध्ये पाईप मोऱ्याची दुरूस्ती करणे. व संरक्षण भिंत बाधणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. **(पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२२-२३)** | ८१८५६३ | ९०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | बागमांडला आंबेत वर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. ११/७०० मध्ये पाईप मोऱ्याची दुरूस्ती करणे. व संरक्षण भिंत बाधणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. **(पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२२-२३)** | ८२६९८१ | ९०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | भावे किये पदाजी रायाचा कोंड रस्ता प्र.जि.मा. ९५ कि.मी. ३/३०० ते ३/४०० मध्ये पूलाचे रोलिंग करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३)** | ३७७३९० | ४०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्र.जि.मा. ६५ कि.मी. १६ / ९०० मध्ये पूलाचे दुरूस्ती करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३)** | ८४०१४७ | ९०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | मौजे केंबुर्ली होळीचा माळ ता. महाड येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(आ. स्था. वि.)** | ३३५३०९ | ४०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | मौजे घावरेकोंड खालचीवाडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(डोंगरी विकास)** | ७०५३७८ | ८०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १२ | मौजे खुटी ग्रा.पं. खुटील येथे मुख्य रस्ता ते राम मंदिराकडे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(डोंगरी विकास)** | ४०६९४९ | ५०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १३ | ग्रा. पं. मांदाड मौजे कुडे येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ५४८२२२ | ६०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |
| १४ | ग्रा.पं. उसर मौजे दहिवली येथे स्मशनाकडे जाणारा रस्ता तयार करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ६५२९८४ | ७०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १५ | ग्रा.पं. तळेगाव मौजे तळेगाव येथे अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ६९१७२२ | ७०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १६ | मौजे गोवेले कुंभारवाडा ता. माणगाव येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड. **(आ.स्था.वि.)** | ६७४६३३ | ७०००/- | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |

**टिप :-** १. तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/६६०**
**दिनांक : १४/०२/२०२३**

विमाका/कोवि/२०२२-२०२३/२७३

# ऐरोली विभागासाठी दहा कोटींचा निधी मंजूर

## आमदार गणेश नाईकांच्या प्रयत्नांना यश; राज्य सरकारमार्फत नागरी सुविधा होणार उपलब्ध

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार गणेश नाईक यांच्या माध्यमातून ऐरोली विधानसभा क्षेत्राचा सर्व समावेशक आणि समतोल विकास होत असताना नाईक यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाचा तब्बल दहा कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर झाला आहे.

या निधीमधून ऐरोली विधानसभा मतदार संघामध्ये आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, दळणवळण, स्कायवॉक, मार्केट अशा सुविधा उभ्या राहणार आहेत. शहरी भाग, गावठाण, झोपडपट्टी, औद्योगिक भाग, आदिवासी परिसर अशा सर्वच विभागांमध्ये सार्वजनिक सुविधांचे सक्षमीकरण केले जाणार आहे.



महापालिका क्षेत्रामध्ये मूलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी राज्य शासनातर्फे निधी देण्यात येतो. लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी मागणी केल्यानुसार या अंतर्गत दहा कोटी रुपयांचा घसघशीत निधी मंजूर झाला आहे. या निधीमधून शहराच्या आणि नागरिकांच्या गरजा ओळखून नागरी सुविधांचे निर्माण केले जाणार आहे.

दिघा विभागात एमआयडीसी आणि रहिवासी क्षेत्र मोठे आहे. या ठिकाणी मुकुंद कंपनीसमोरचा रस्ता सदैव वर्दळीचा आणि वाहतुकीचा आहे. एक कोटी रुपयांच्या निधीमधून या ठिकाणी मुकुंद कंपनीसमोरील रस्त्याचे काँक्रिटीकरण केले जाणार आहे. त्यामुळे या ठिकाणची वाहतूक सुरळीत होणार आहे. दिघा, आनंद नगर, ईश्वर नगर आणि परिसरात राहणाऱ्या लाखो नागरिकांना आणि एमआयडीसीमध्ये काम करण्यासाठी दररोज येणाऱ्या हजारो कामगारांना दिलासा मिळणार आहे. त्याचबरोबर या ठिकाणी होणारी वाहतूककोंडी कमी होण्यासदेखील मदत होणार आहे.

**दिघा रेल्वे स्थानकात स्कायवॉक**

माजी खासदार संजीव नाईक यांच्या मागणी आणि पाठपुराव्यानुसार दिघा येथे नवीन रेल्वे स्थानक उभारण्यात आले आहे. येत्या काही दिवसात हे स्थानक जनतेसाठी खुले करण्यात येईल, परंतु या स्थानकातून बाहेर पडताना आणि स्थानकात येताना समोरील ठाणे-बेलापूर मार्ग ओलांडून यावे लागणार आहे. येथील रस्ता अतिशय वर्दळीचा असल्याने रस्ता ओलांडताना अपघाताचा धोका कायम आहे. ही बाब लक्षात घेता या ठिकाणी स्कायवॉक उभा करण्यात येणार आहे. दीड कोटी रुपयांच्या खर्चातून हा स्कायवॉक उभा राहिल्यावर या ठिकाणाहून विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडता येणार आहे.

**नवीन मासळी मार्केट**

ऐरोली सेक्टर एक येथे जुने मासळी मार्केट आहे. मासळी विक्रेते आणि रहिवाशांच्या मागणीनुसार या मार्केटची पुनर्बांधणी हाती घेण्यात येणार आहे. या ठिकाणी चांगल्या प्रकारच्या सुविधा पुरविण्यात येणार आहेत. ५० लाख रुपयांच्या निधीमधून या मासळी मार्केटची पुनर्बांधणी केली जाणार आहे.

**मंडईच्या इमारतीची नव्याने उभारणी**

मंडईमुळे परिसरातील रहिवाशांना स्थानिक ठिकाणी भाजीपाला व अन्य सामान खरेदी करता येते. ऐरोली सेक्टर ३ येथे जय भवानी मंडई आहे. या मंडईची नव्याने उभारणी करावी, अशी येथील व्यापारी विक्रेते आणि स्थानिक नागरिकांची मागणी होती. लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी या मागणीची दखल घेत या ठिकाणी एक कोटी रुपयांच्या निधीमधून जय भवानी मंडईच्या इमारतीची नव्याने उभारणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**घणसोलीत नागरी आरोग्य केंद्र**

आमदार गणेश नाईक यांनी आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, साफसफाई या मूलभूत सोयी-सुविधांना नेहमीच प्राधान्य दिलेले आहे. घणसोलीतील सेक्टर ७ येथील रहिवाशांना आरोग्य सुविधांचा लाभ घेण्यासाठी दूरवरच्या नागरी आरोग्य केंद्रामध्ये जावे लागते आहे. सेक्टर सात मध्येच नागरी आरोग्य केंद्र असावे, अशी येथील रहिवाशांची मागणी होती. ही मागणी आता पूर्णत्वास जाणार असून सेक्टर ७ येथील भूखंड क्रमांक सहावर तब्बल दोन कोटी रुपये खर्चून सुसज्ज असे नागरी आरोग्य केंद्र उभे राहणार आहे.

**अडवली-भूतवली येथे शाळेत वाढीव मजले**

नवी मुंबईतील अडवली-भूतवली हा आदिवासी बहुल विभाग. आमदार गणेश नाईक यांनी या विभागात सर्व प्रकारच्या नागरिक सुविधा आजतागायत उपलब्ध करून दिलेल्या आहेत. आदिवासी बांधवांसाठी मोफत घरकुल योजनादेखील पालिकेच्या माध्यमातून राबवलेली आहे. या भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या वास्तूमध्ये गुणवत्ता पूर्ण शिक्षण घेता यावे यासाठी येथील शाळा क्रमांक ४१ मध्ये वाढीव मजल्यांचे बांधकाम विशेष निधी मधून एक कोटी रुपये खर्चून करण्यात येणार आहे. या शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय असून शाळेवर वाढीव मजले बांधल्यानंतर अधिकच्या वर्ग खोल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहेत.

**कोपरखैरणेत रात्र निवारा केंद्र**

कोपर खैरणे परिसरात अनेक तरुण-तरुणी, विद्यार्थी नोकरीच्या शोधात अथवा शिक्षण घेण्यासाठी आपले मित्र परिवार, आप्तेष्ट आणि परिचयाच्या व्यक्तींकडे येत असतात, परंतु या दरम्यान कुठे राहायचे? हा एक मोठा यक्ष प्रश्न त्यांच्यासमोर असतो. या युवा वर्गाची आणि विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी कोपरखैरणे सेक्टर दोन मधील भूखंड क्रमांक २६ या ठिकाणी रात्र निवारा केंद्र उभारण्यात येणार आहे. या केंद्रासाठी विशेष निधीमधून दोन कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. हे रात्र निवारा केंद्र उभे केल्यावर हजारो युवा आणि विद्यार्थ्यांना राहण्यासाठी निवारा प्राप्त होणार आहे.

**रबाळेत नवीन पाणी वितरण व्यवस्था**

रबाळे येथील आंबेडकर नगर, पंचशील नगर, कातकरी पाडा, वारली पाडा, दुर्गा मंदिर परिसर, वाल्मिकी मंदिर परिसर हा झोपडपट्टी आणि आदिवासी बांधवांचा परिसर. कष्टकऱ्यांचा विभाग. या परिसरातील रहिवाशांना सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी या भागात नवीन जलवाहिन्या टाकण्यात येणार आहेत. या कामासाठी साधारणपणे एक कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार असून यामुळे येथील पाणीपुरवठा व्यवस्थेचे सक्षमीकरण केले जाणार आहे. या भागातील लाखो रहिवाशांना त्यामुळे दिलासा मिळणार आहे.

**राज्य सरकारकडून मंजूर करून आणलेल्या दहा कोटी रुपयांच्या विशेष निधीमधून शहरातील नोड, गाव, गावठाण, झोपडपट्टी परिसर, औद्योगिक विभाग, आदिवासी विभाग सर्वच ठिकाणी सार्वजनिक सुविधांची कामे हाती घेण्यात आली आहेत.**

**-आमदार गणेश नाईक**

# बेलापूरमध्ये अनधिकृत बांधकामावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील अे विभाग बेलापूर कार्यालयांतर्गत करावे गाव, साईबाबा मंदिराजवळ, साईवाडी करावे गाव, बेलापूर येथे नवी मुंबई महापालिकेची कोणतीही पूर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे बांधकाम केले होते.

या अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते. त्यामुळे या अनधिकृत बांधकामावर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात येऊन अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.



या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालयामधील अधिकारी अथवा कर्मचारी, १२ मजूर, एक गॅस कटर, दोन इलेक्ट्रीक हॅमर तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलीस तैनात होते. यापुढेदेखील अशाप्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे, असे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# पलावा येथे अपोलो क्लिनिक सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पलावा हे कल्याण-डोंबिवली, मुंबई, ठाणे महानगर प्रदेशातील एक वाढणारे शहर आहे आणि अपोलो हॉस्पिटल्सकडून मल्टीस्पेशालिटी क्लिनिकची जोड तेथील लोकांसाठी आरोग्यसेवेसाठी एक महत्वाचे पाऊल आहे. यामुळे निश्चितच परिसरातील लोकांना उत्तम दर्जाची आरोग्य सेवा मिळणार आहे.




अपोलो क्लिनिक नवी मुंबईच्या अपोलो हॉस्पिटल्सचे युनिट हेड डॉ. किरण शिंगोटे, मार्केटिंग पश्चिम क्षेत्र उपाध्यक्ष सुश्री अवंती पवार, अपोलो क्लिनिकचे सहाय्यक महाव्यवस्थापक सुधांशू शर्मा आदींच्या प्रमुख उपस्थितीत सुरू करण्यात आले आहे.

नवी मुंबईच्या अपोलो हॉस्पिटल्सचे युनिट हेड डॉ. किरण शिंगोटे या वेळी म्हणाले की, पलावा हे मुंबई महानगर प्रदेशातील एक वाढणारे शहर आहे अपोलो द्वारे पलावा येथे मल्टीस्पेशालिटी अपोलो क्लिनिक सुरू करणे हा एक महत्त्वपूर्ण विकास आहे जो उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा सर्व समाजाच्या जवळ आणेल. आम्हाला पलावाकडून अनेक रेफरल्स मिळतात. आमचे हॉस्पिटल आणि वैद्यकीय वैशिष्ट्यांच्या विस्तृत श्रेणीमध्ये प्रवेश सुधारू इच्छितो, रूग्णांना सर्वसमावेशक काळजी देऊ इच्छितो आणि प्रदेशातील आरोग्य सेवा पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी योगदान देऊ इच्छितो.

तसेच ते पुढे म्हणाले की, पलावा हे कल्याण-डोंबिवली, मुंबई, ठाणे, महानगर प्रदेशातील एक वाढणारे शहर आहे आणि अपोलो हॉस्पिटल्सकडून मल्टीस्पेशालिटी क्लिनिकची जोड नवी मुंबई हे या भागातील आरोग्यसेवा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

## निवडक

### काशिनाथ जाधव यांची निवड

**पनवेल :** येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय या संस्थेचे कार्यवाह व जनजागृती ग्राहक मंच



पनवेल शाखेचे अध्यक्ष काशिनाथ जाधव यांची रविवारी (दि. १२) महाड येथे झालेल्या रायगड जिल्हा ग्रंथालय संघाच्या वार्षिक सभेत सन २०२३-२०२६ या कालावधीकरिता संचालकपदी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल काशिनाथ जाधव यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### उरणमध्ये वीर वाजेकरांची पुण्यतिथी

**उरण :** कामगारांचे नेते, कष्टकऱ्याचे दैवत म्हणून प्रसिद्ध असलेले उरणचे भाग्यविधाते म्हणून परिचित असलेले वीर



वाजेकर यांच्या ४२वी पुण्यतिथीनिमित्त बुधवारी (दि. १५) उरण कोटनाका येथे अभिवादन करण्यात आले. या वेळी विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते, विविध सामाजिक संस्था, संघटनाचे पदाधिकारी व सदस्यांनी पुष्पहार अर्पण करून वीर वाजेकर यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर उपस्थितांनी वीर वाजेकर यांच्या कार्याची व विचारांची ओळख करून दिली.

# नवी मुंबईत संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी नाका येथील असंघटित कामगारांच्या वतीने संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी शिंदे गटाचे कामगार नेते प्रदीप बी. वाघमारे हे उपस्थित होते.

या वेळी प्रदीप वाघमारे यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कामगारांच्या वतीने विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. या वेळी कामगार नेते प्रदीप वाघमारे यांनी संत सेवालाल महाराजांच्या कार्याबद्दल कामगारांना माहिती देऊन संत सेवालाल महाराजांच्या विचारावर चालण्याचे आवाहन केले.

जयंती उत्सव साजरा करण्यासाठी कामगार नाका अध्यक्ष राजू घोडे, सचिव राजेश पारवे, खजिनदार अशोक चव्हाण, कृष्ण घाटोळे, गजानन जाधव, बापू शेळके, विलास जाधव यांनी परिश्रम केले.



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बंजारा समाजाचे आराध्य दैवत धर्मगुरू संत श्री सेवालाल महाराज यांची २८४वी जयंती नवी मुंबई माजी महापौर जयवंत सुतार यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजीनगर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार यांनी संत श्री सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बंजारा समाज बांधवांनी पारंपारिक वेषभूषा करून गितांच्या रूपाने मोठ्या उत्साहात नयंती महोत्सवात सहभाग घेतला. या वेळी महाप्रसाद वाटप, धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संत जय सेवालाल मित्र मंडळाचे अध्यक्ष मनोहर राठोड, देवराम राठोड, राजू राठोड, विठ्ठल राठोड वार्ड अध्यक्ष सुभाष जाधव, समाजसेवक भारत गपाट, वासुदेव ताठे, प्रभाकर भालेराव, किसन राठोड, हरी राठोड, दिनेश जाधव आदींनी मेहनत घेतली.

# दासनवमी उत्सवाची सांगता



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील पुरातन रामदास मारूती मंदिरातील दासनवमी उत्सवाची सांगता झाली.

माघ वद्य प्रतिपदा ते नवमी या काळामध्ये हा उत्सव झाला. उत्सव कालावधीमध्ये रोज पहाटे समर्थ सांप्रदायानुसार काकड आरती, नित्य दासबोधवाचन, दुपारी महिलांसाठी विविध कार्यक्रम, नामसंकीर्तन, सायंकाळी आरती, रात्री गायन, भजन, कीर्तन वगैरे सांस्कृतिक कार्यक्रम झाले. एक दिवस भिक्षाफेरी काढण्यात आली. नवमीच्या रात्री पुणे येथील प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. विश्वासबुवा कुलकर्णी यांचे संत तुलसीदास या विषयावर कीर्तन झाले. त्यांना चंद्रकांत मने यानी संवादिनी व गणेश घाणेकर यांनी तबलासाथ केली.

महाप्रसादाने या उत्सवाची सांगता झाली. या रामदास मारुती मंदिराला ११० वर्षे पूर्ण झाली असून हा १०६ वा दासनवमी उत्सव आहे, अशी माहिती मंदिराचे विश्वस्त समीर खरे यांनी दिली.

# कॅशलेस तिकीट वितरीत करणाऱ्या वाहकांचा सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

कॅशलेस तिकीट वितरीत करणाऱ्या वाहकांचा नवी मुंबई महापालिका परिवहन मुख्यालय, सिबीडी-बेलापूर येथे गुरुवारी (दि. १६) परिवहन व्यवस्थापकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाच्या बसेसमधून प्रवास करतांना प्रवाशांनी तिकीट काढण्यासाठी रोख रक्कम देण्याऐवजी कॅशलेस व्यवहारासाठी फोन-पे, क्युआर कोड स्कॅनिंग तसेच एनएमएमटी बस ट्रॅकर ॲपद्वारे तिकीट बुकींग व ऑनलाईन बसपास यांच्या माध्यमातून ऑनलाईन पेमेंटची सुविधा देण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने परिवहन उपक्रमाच्या प्रवाशांकडून जास्तीत जास्त फोन-पे ॲपद्वारे ऑनलाईन पद्धतीने कॅशलेस तिकीट विक्रीची रक्कम स्विकारुन ही रक्कम जमा करणाऱ्या वाहकांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, कॅशलेस पेमेंट पद्धतीचा वापर जास्तीत जास्त करावा, असे आवाहन नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमामार्फत प्रवाशांना करण्यात येत आहे.



# ध्वनी प्रदुषण करणाऱ्या कंपनीविरोधात गुन्हा नोंदवावा

## भाजपच्या संकेत डोके यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे सेक्टर १९ येथील 'तुर्भे रेल्वे यार्ड' येथे 'भारतीय कंटेनर निगम, कॉनकॉरचे कंटेनर व्यवस्थापनाचे काम चालते. गेले काही महिने या व्यवस्थापनाच्या माध्यमातून अनधिकृतपणे सिमेंट प्रोसेसींग प्लांट सुरू आहे. या माध्यमातून कंटेनरमधून यंत्राच्या सहाय्याने सिमेंट बल्कर वाहनांत भरले जाते. या सर्व प्रक्रियेत सातत्याने मशीनचा मोठा आवाज होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. पोलिसांनी या ध्वनी प्रदूषण करणाऱ्या कंपनीवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी भाजपाचे संकेत डोके यांनी एपीएमसी पोलिसांना पत्र लिहून केली आहे.

सेक्टर २६ येथील या कंटेनर यार्डमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या ठिकाणी सिमेंट भरणे सातत्याने सुरू असते. या सिमेंट कंटेनरमधून प्रवास केल्यामुळे कडक होत असल्यामुळे प्लांटच्या माध्यमातून पावडर स्वरूपात करून बल्करमध्ये भरले जाते. या प्लांटसाठी वापरण्यात येणारी मोटार तसेच कंटेनर उचलणे व ठेवणे कामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेनमुळे हा आवाज हा १०० डेसिबलपेक्षा जास्त असून या आवाजाचा थेट परिणाम येथील प्लांटच्या बाजूला असलेल्या सेक्टर २६ मधील रहिवाशी भागाला होत आहे. त्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

याबाबत कॉनकॉरला लेखी तक्रार तसेच त्यांच्या व्यवस्थापनाशी बैठक केली असून अद्याप काहीही कारवाई त्यांच्याकडून करण्यात आलेली नाही. या परिसरातील नागरिकांना दिवसरात्र १०० डेसिबलपेक्षा जास्त आवाजाचा सामना करावा लागत आहे. यामुळे नागरिकांचे मानसिक व शारिरिक आरोग्य धोक्यात आले आहे. यामुळे पोलिसांनी तक्रारीच्या अनुषंगाने स्वतः पाहणीकरून आवाजाचे डेसिबल तपासून संबंधीत कॉनकॉर व्यवस्थापनावर गुन्हा नोंद करून कारवाई करावी, अशी मागणी डोके यांनी केली आहे.

निवडक



## सना खान जिल्ह्यात व्दितीय

**म्हसळा :** कोकण उन्नती मित्र मंडळाचे वसंतराव नाईक कला,वाणिज्य व बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालयात गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव यांच्यावतीने आयोजित केलेल्या गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेत सना युसूफ खान या विद्यार्थीनीने रायगड जिल्ह्यातून व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. सनाच्या यशाबद्दल गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्र व रौप्य पदक देऊन प्रभारी प्राचार्य डी.ए.टेकळे यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी गांधी विचार संस्कार परीक्षेचे समन्वयक प्रा. आर. एस. माशाळे, प्रा. डॉ. एम. एच. सिद्दीकी, प्रा. के. एस. भोसले, प्रा. उमासरे, प्रा. सलमा नझिरी, प्रा. सादिका अंसारी, प्रा.अतिका नजीरी, प्रा. बडे, प्रा. तनुजा मुजावर उपस्थित होते. गांधीजींचे विचार युवकांच्या जीवनात बिंबवले जावे व आजचा युवक हा स्वच्छतेविषयी जागरूक राहून आपले जीवन निर्व्यसनी व सत्यतेच्या मार्गाने जगावे हा उपदेश या परीक्षेद्वारे देण्याचा प्रयत्न आहे. महाविद्यालयात गेली सात वर्षांपासून ही परीक्षा घेतली जाते. याचा लाभ घेत अनेक विद्यार्थ्यांनी जिल्ह्यातून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. सनाचे यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, सचिव प्रतिनिधी फजल हळदे, सदस्य महादेव पाटील, निलम वेटकोळी, प्र. प्राचार्य, गांधी विचार संस्कार परीक्षेचे समन्वयक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्याकडून अभिनंदन होत आहे.

## शहापूर येथील अपघातात जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू

**अलिबाग :** शहापूर येथील अपघातात जखमी झालेला प्रतीक धर्माजी पाटील (वय, ३४) यांचा मंगळवारी (दि.१४) मृत्यू झाला. ७ फेब्रुवारी रोजी प्रतीक पाटील आपल्या दुचाकीवरून घरी जात असताना सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास अलिबाग तालुक्यातील शहापूर येथे त्यांच्या गाडीला अपघात झाला. त्यात प्रतीक गंभीर जखमी झाला. जखमी प्रतीक यास वडखळ येथील संजीवनी रुग्णालयात उपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्याला एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. १४ फेब्रुवारी रोजी त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. हा अपघात नसून घातपात आहे असे प्रतीक पाटील यांच्या नातेवाईकांचे म्हणणे आहे.

# वृक्षांची कत्तल आणि वणव्यामुळे दुर्मिळ पक्ष्यांचे अधिवास संपुष्टात

**खोपोली : प्रतिनिधी**



वृक्षांच्या बेसुमार तोडीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. त्याचबरोबर पक्ष्यांचे निवासस्थान असलेल्या वृक्षांवर आपण घाव घालण्यास सुरुवात केली आहे. यामुळे पक्ष्यांचे अधिनिवास नष्ट होत चालले आहेत. पूर्वी जंगलात मोठ्या प्रमाणात वृक्ष असायचे त्याचबरोबर पक्ष्यांचे मंजुळ स्वरही कानी पडत असत. मात्र मानवानी स्वताच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वृक्षांच्या मुळावर घाव घालण्यास सुरुवात केली आणी पक्षांचे मंजुळ स्वर कानी पडण्याचे बंद झाले आहे.

वृक्ष वाढण्यासाठी कित्तेक वर्ष लागत असतात. मात्र त्यांची कत्तल करण्यासाठी काही क्षण लागत आहेत. यामुळे वृक्षांवर अधिवास करणार्या घुबड, घार, गिधाडे, मोर, पोपट कावळा, चिमणी, पारवे असे दुर्मिळ पशुपक्ष्यांचे आश्रयस्थाने नष्ट होत चालली आहेत. यामुळे त्याचा अधिवास जपणे ही काळाची गरज बनली आहे. ग्रामीण भागात डोंगरामध्ये, रस्त्याच्या बाजूला वड, चिंच, पिंपळाची, आब्यांची पुरातन वृक्ष असायचे परंतु डोंगर तसेच जंगलात वणवे पेटण्याचे प्रमाण वाढल्यामुळे त्याची झळ बसून अनेक वृक्ष जळून खाक होत असल्याचे दुर्देवी चित्र आपणास पाहायला मिळत आहे. तर काही ठिकाणी झाडे सुकली आहे. या नावाखाली वृक्षतोड करण्यात येत आहे. रस्त्याची रुंदी वाढवण्याच्या नावाखाली वृक्षांची तोड करण्यात येत आहे. यामुळे या झाडांच्या खोडांमध्ये राहाणाऱ्या पक्ष्यांना आपले घर गमवावे लागत आहे.

### निसर्गाचा ऱ्हास

भारतीय संस्कृतीमध्ये घुबडाला महालक्ष्मीचे वाहन म्हटले आहे. मात्र, महालक्ष्मीचे वाहनच सध्या धोक्यात आले आहे. अंधश्रद्धेच्या नावाखाली शुभ-अशुभाच्या चक्रव्यूहात हा पक्षी संकटात सापडले आहे. निसर्गाचा ऱ्हास सुरू झाला आहे. यामुळे सर्व स्थरांतून पक्षी वाचवण्यासाठी संकल्प करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# खालापूर शाळेचे स्नेहसंमेलन नृत्य, नाटीका कार्यक्रमाने रंगले

**खोपोली : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खालापूर आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थ्यांचे कलागुण पाहून उपस्थित भारावून गेले होते. राजिप शाळा खालापूरकेंद्र प्रमुख निशा देशमुख यांच्या मार्गदशनखाली मुख्याध्यापक सचिन कडू,संदीप वाघ, मीनल धोत्रे यांनी उत्तम आयोजन केले होते. गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, नाटीका यांनी उपस्थितांची मन जिंकली.

यावेळी माजी उपसभापती उमेश गावंड,माजी सरपंच सुरेश पेंडसे,नगरसेविका लता लोते,नगरसेविका दीपाली जाधव,माजी नगरसेविका मंगल चाळके,माजी उपसरपंच मंदाताई भोसले,सोमठणकर आण्णा,पत्रकार सुधीर माने,पत्रकार विशाल वाघमारे, पालक कमिटी अध्यक्ष मिलिंद भोसले,संतोष नाना पाटील,उमेश विचारे ,मारुती दासरे,जगदीश मोहणे, जयश्री सुर्वे, दिलीप देशमुख गुरुजी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गजानन महाराज प्रकट दिन साजरा




**खोपोली :** शेगावच्या श्री गजानन महाराजांचा प्रकट दिन सोहळा खोपोली शिळफाटा येथे हनुमान मंदिरात उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने मंदिरात आकर्षक फुलांची सजावट रोषणाई करण्यात आली. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रसिकलाल जोशी, मयूर पाटकर, ऋषिकेश मनोरे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते श्रींच्या मूर्तीचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर परिसरातील हजारो भाविकांनी मंदिरात दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला.

# पनवेलमध्ये २५ तारखेला भरणार आगरी डॉक्टर, वकीलांची परिषद

**पेण : प्रतिनिधी**

वकील आणि डॉक्टर हे समाजातील ज्ञानी, बुध्दीवंत, विचारवंत, उच्चशिक्षित घटक असल्याने त्यांना समाज जीवनाचे आकलन अधिक चटकन होऊ शकते. म्हणूनच अशा प्रगल्भ विचारसरणीच्या आगरी समाजातील समस्त वकील, डॉक्टर वर्गाकडून समाजाच्या प्रगतीचा मार्ग शोधण्याकरिता एक विचारमंथन परिषद शनिवार दि. २५ फेब्रुवारी २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजता पृथ्वी हॉल, पहिला माळा, शबरी हॉटेल मागे, सेक्टर-१ नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.

परिषदेत योग्य मार्गदर्शनाअभावी इतरत्र भरकटू लागलेल्या तरुणाईच्या जीवनाला नवी कलाटणी देणारा यशाचा मार्ग कळावा, विस्थापित होऊ लागलेला समाज आणि परिवर्तनाचे विस्तारले जाणारे परीघ यामध्ये हरवू लागलेले समाजाचे अस्तित्व, भरमसाठ वेगाने वाढत्या नागरिकिकरणात आणि महाकाय विकास चक्रात चिरडून जाणारं समाजाचं उजाड भविष्य, येणाऱ्या काळात पेलावी लागणारी नवी आव्हाने आणि या बदलत्या समाजरचनेत सामाजिक ऐक्य व आपसातला सलोखा टिकवण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न आणि पारंपरिक प्रथा-परंपरेत गुरफटलेल्या समाजमनाला आधुनिक विचारांची सांगड घालून समाजाला मुख्य प्रवाहात आणावे. याशिवाय विविध अंगांना स्पर्श करण्यासाठी ज्ञातीचे एक घटक म्हणून सामाजिक बांधिलकी जपत पनवेल तालुक्यातील समस्त आगरी वकील-डॉक्टरांनी या विचारमंथन परिषदेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत पाटील यांनी केले आहे.

## रोह्यात सॅनिटरी नॅपकिन वाटप

**रोहे :** एम. बी. मोरे फाऊंडेशन संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव येथे विद्यार्थीनीसाठी 'सॅनिटरी नॅपकिन बँक' या उपक्रमाअंतर्गत सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप करण्यात आले. उपस्थित प्रमुख मार्गदर्शक डॉ. सलमा मुजावर यांनी मुलीच्या 'मासिक पाळी' विषयी समज-गैरसमज आणि योग्य काळजी आहार कोणता घ्यावा याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर इयत्ता ७ वी - १२ वी मधील विद्यार्थिनीना सॅनिटरी नॅपकिन पॅडचे मोफत वाटपही केले. या कार्यक्रमात १६० विद्यार्थिनी उपस्थित होत्या. सूत्रसंचालन प्रा. माधुरी जाधव यांनी केले.

# संत सेवालाल यांचा आदर्श प्रत्येकाने जोपासावा

## खुशाल राठोड यांचे प्रतिपादन; मुरुड येथे जयंती साजरी

**मुरुड : प्रतिनिधी**

संपूर्ण समाजाला दिशा देण्याचे काम संत सेवालाल यांनी केले आहे. त्यांचा आदर्श व त्यांची शिकवण प्रत्येकानी जोपासली पाहिजे. तरच समाजात प्रगती होणार असल्याचे मंडळ अधिकारी खुशाल राठोड यांनी सांगितले.



बंजारा समाजाचे आराध्य दैवत थोर संत सेवालाल महाराज यांची १८४ वी जयंती मोठ्या उत्सहात संपन्न झाली.मुरुड पंचायत समितीच्या दालनात यावेळी असंख्य समाज बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी मुरुड महसूल खात्यामधील मंडळ अधिकारी खुशाल राठोड यांच्या हस्ते महाराजांच्या तसबिरीला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. यावेळी मुरुड तालुका बंजारा समाजाचे अध्यक्ष विजय राठोड, पशु वैद्यकीय अधिकारी डॉक्टर विनायक पवार, जिल्हा परिषदेचे शिक्षक भास्कर साळावकर, जेष्ठ पत्रकार मेघराज जाधव, विठल वडते, किरण जाधव, राम जाधव, गोरखनाथ राठोड, भरत चव्हाण उपस्थित होते.

यावेळी समाजाचे अध्यक्ष विजय राठोड यांनी मागणी केली की, संत सेवालाल महाराज यांनी समाजाला एकत्र आणून त्यांना दिशा दाखवण्याचे काम केले. सोशीत समाजाला अन्य्याच्या जोखडातून मुक्त केले. संत सेवाला महाराज हे बंजारा समाजाचे आराध्य आहेत. अश्या या तर संत शिरोमणी सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्ताने महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

शासनाच्या अध्यदेशाप्रमाणे त्यांची जयंती प्रत्येक कार्यालयात साजरी होत आहे. परंतु सार्वजनिक सुट्टी दिल्यामुळे समाज बांधवाना या जयंती निमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमांना पुरेसा वेळ देता येईन जयंती मोठ्या उत्सहात साजरी करता येणार आहे. यासाठीच समाजातर्फे शासनाकडे ही प्रमुख मागणी त्याचप्रमाणे राज्यातील कोणत्याही अभयारण्याला संत सेवाला महाराज यांचे नाव द्यावे अशी मागणी राठोड यांनी केली. सूत्रसंचालन चेतन चव्हाण यांनी केले. यावेळी त्यांनी संत सेवालाल महाराज याना आयुर्वेदाची जाण होती. म्हणूनच आज प्रत्येक तांड्यासामोर व प्रत्येक घरामागे कडुलिंबाचे झाड दिसून येते. त्यांचा आदर्श आजच्या नवीन पिढीने घेतला पाहिजे, असेही ते म्हणाले.

# नेरळमधील शिबिराला मोठा प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील हर्मोनी फाऊंडेशन आणि पनवेल येथील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल तसेच सुश्रुषा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या माध्यमातून आरोग्य तपासणी आणि नेत्र चिकित्सा तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरातील नऊ रुग्णांना तत्काळ नवीन पनवेल येथील रुग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी दाखल केले आहे.




नेरळ येथील चिंचआळी येथे हार्मनी फाऊंडेशन यांच्या वतीने दर महिन्याला नेत्र चिकित्सा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले जाते. पनवेल येथील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल तसेच सुश्रुषा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या माध्यमातून आयोजित केलेल्या शिबिराचे उद्घाटन हार्मनी फाऊंडेशनचे संचालक नितीन कांदळगावकर, नम्रता कांदळगावकर, नेरळ रेल्वे प्रवासी संघटना अध्यक्ष संदीप म्हसकर आणि आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी प्रकाश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात ४२ रूग्णांनी नेत्र चिकित्सा करून घेतली. १५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे डॉक्टरांनी निश्चित केले. त्यातील नऊ रुग्णांना आरोग्य शिबिर संपल्यानंतर तत्काळ नवीन पनवेल येथे नेण्यात आले. या शिबिरात सुश्रुषा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकडून ४५ रुग्णांची शुगर, रक्तदाब तपासले आणि इसिजी काढण्यात आली.

आर झुनझुनवाला शंकरा आय रुग्णालय यांच्याकडून डॉ. अपर्णा हरेंद नाथ, सहायक नंदिनी देवघरकर, नेत्रा होडबे, स्वाती विश्वकर्मा, कल्पेश सावंत यांनी रुग्णांची तपासणी करण्याचे काम केले. तर रक्तदाब, शुगर, ईसीजी काढण्याचे काम डॉ. राजेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक साक्षी पाटील, मैनाज, कॅम्पप्रमुख जयदास जाधव यांनी केले.

# वदप येथील शेतकऱ्याने विविध जातीच्या कलिंगडची केली लागवड

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वदप येथे कलिंगडाची शेती केली असून विनय वेखंडे या प्रगतशील शेतकऱ्याने ही शेती केली असून त्यांच्या शेतात तब्बल दहा किलो वजनाचे कलिंगड लागली आहेत. महाशिवरात्रीसाठी कलिंगडाला आणि त्यासाठी विनय वेखंडे यांच्या शेतात पिकलेली कलिंगडे यांना मोठी मागणी असते.



वदप गावातील शेतकरी विनय मारुती वेखंडे हे गेली दहा वर्षे कालिंगडाची शेती करतात. ब्लॅक बॉय बॉय आणि शुगर या जातीची कलिंगडाचे पीक ते त्यांच्या शेतात घेत असतात. शुगर जातीची कलिंगडे ही लहान आकाराची लांबट असतात आणि त्यांना मोठी मागणी असते. मात्र या वर्षी त्यांच्या शेतात केवळ ब्लॅक बॉय जातीचे कलिंगड यांची शेती केली गेली आहे. महाशिवरात्रीसाठी कलिंगडे यांना मोठी मागणी असते. त्यामुळे प्रयोगशील आणि प्रगतशील शेतकरी विनय वेखंडे यांनी आपल्या शेतात कलिंगडे पीक घेण्यासाठी तसे नियोजन केले आहे. मल्चिंग पेपर आणि ठिबक सिंचन या डवले केली जाणारी शेती यामुळे त्यांच्या कलिंगडाचे झाडांना साडे चार पासून दहा किलो वजनाचे कलिंगड तयार झाले आहे. पाण्याचे तसेच सेंद्रिय खतांचे योग्य नियोजन आणि कृषी विभागाकडून सातत्याने मार्गदर्शन यामुळे कलिंगडाचे पीक दर वर्षी चांगले आणि जोमदार येत असते.

महाशिवरात्री रोजी बहुतेक भाविक कलिंगड खात असतात. ते लक्षात घेऊन कर्जत तालुक्यातील मोठी गर्दी असलेले तीर्थस्थळ वैजनाथ येथे वेखंडे कुटुंब स्वतः गाडी घेऊन कलिंगडे घेऊन जातात तसेच त्यांच्या गावाजवळ असलेल्या कुशीवली येथील मंदिरात देखील शिव भक्त गर्दी करतात. त्यामुळे तेथे देखील कलिंगड विक्री केली जाते. सध्या पनवेल खारघर येथे सुरु असलेल्या कृषी महोत्सवात वेखंडे यांच्या शेतातील कलिंगडे भाव खाऊन जात आहेत.

# रेवदंडा आरोग्य केंद्रामध्ये बेबी वॉर्मरचे लोकार्पण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात रोटरी क्लब ऑफ अलिबाग सीशोअर व डिस्ट्रिक्ट ३१३१ यांच्या सहकार्याने रोटरी फाउंडेशनच्या ग्लोबल ग्रांट योजने अंतर्गत बेबी वॉर्मर संचाचे बुधवारी लोकार्पण करण्यात आले.



रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसुती कक्षात मुदतीपूर्व प्रसूत झालेल्या बालकांच्या आरोग्याच्यादृष्टीने त्यांचे अकाली मृत्यू होऊ नये यासाठी नियोजित केलेल्या बेबी वॉर्मरचा संच बॅटरी बॅकसह प्रदान करण्याचा कार्यक्रम क्लबचे माजी अध्यक्ष, रोटरियन बालरोगतज्ञ डॉ. राजेंद्र चांदोरकर यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. निमिष परब, प्रेसिडेंट इलेक्ट रो. डॉ निलेश म्हात्रे, क्लबचे माजी अध्यक्ष डॉ. प्रमोद कुमठेकर, सचिव रो. कुमार जोगळेकर, रो. दिलीप कुमार भड, अंकुश पाटील, श्री सावंत तसेच रेवदंडा ग्रामपंचायत सरपंच मनिषा चुनेकर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राकेश यादव व डॉ. सोनिया, डॉ. आपटे, डॉ. विलास ढोलके, डॉ. अमर पाटील, डॉ. किरण जैन व आरोग्य सेविका आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

रोटरीच्या या प्रोजेक्ट ममता अंतर्गत रायगड व पुणे जिल्ह्यात ११० बेबी वॉर्मर संच विविध आरोग्य केंद्रात बसवण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. डॉ. अनिल परमार, डी फाउंडेशन डायरेक्टर रो. संतोष मराठे, डी. सिनर्जी प्रोजेक्ट डायरेक्टर रो. चारू श्रोत्री, रोटरी डी ३१३१ मधील ५६ रोटरी क्लब्ज आणि पुणे, पिंपरी, चिंचवड व रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांचे सहकार्य लाभले. सोमवारी धोकवडे प्राथमिक आरोग्य केंद्रात या बेबी वॉर्मर संचाचे लोकार्पण करण्यात आले तर येत्या दोन दिवसांत पोयनाड प्राथमिक आरोग्य केंद्रातसुद्धा या बेबी वॉर्मर संचाचे लोकार्पण करण्यात येणार आहे, असे रोटरी क्लब ऑफ अलिबागचे अध्यक्ष रो. निमिष परब यांनी नमुद केले.

अलिबागमध्ये पुनः प्रस्थापित झाल्यापासून रोटरी क्लब ऑफ अलिबाग मागील पाच-सहा वर्षांत अनेक छोट्या मोठ्या सामाजिक उपक्रमांत सहभागी होत आहे मग काही मेडिकल चेकअप कॅम्प असोत, आरोग्या विषयी चर्चासत्रे असोत, समुद्र किनाऱ्यावरील साफ सफाई, हॅपी स्कुल (जेथे पेझारी येथील रा. जि. प शाळेतील मुलांच्या आरोग्याविषयी व्याख्याने-चेक अप, परसबागेचेमहत्व, वृक्षारोपण इत्यादीवर भर दिला जातो), हॅपी व्हिलेज (यात सागवाडी बेलोशी येथे मेडिकल चेक अप, स्वच्छता, शाळेची डागडुजी इत्यादी), वृक्षारोपण-जंगल कॉन्सेप्ट ( थळ-डोंगरी येथे) इत्यादी नव नवीन संकल्पना क्लब राबवत आले आहे.

सूत्रसंचालन माधुरी म्हात्रे यांनी केले तर आभार सौरभ आपटे यांनी मानले.

### रोटरीचे योगदान

रोट्रॅक्ट क्लबच्या मदतीने हिवाळ्यात फुटपाथवरील लोकांना ब्लँकेटचे वाटप, पक्ष्यांना दाना-पाण्याची व्यवस्था, कुत्र्यांना अन्नदान, ट्रॅफिक पोलिसांना ताक वाटप, लोकांसाठी रक्तदान इत्यादी अनोख्या कार्यक्रमात रोटरीचे सदस्य योगदान देण्यासाठी नेहमीच उत्सूक असतात, असे प्रतिपादन क्लबचे माजी अध्यक्ष व बालरोगतज्ञ रो डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी केले.

### महिला टी२० विश्वचषक

# भारताचा वेस्ट इंडीजवर सहा विकेट्सने विजय

## दीप्ती ठरली विजयाची शिल्पकार

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेत सुरू असलेल्या महिला टी-२० विश्वचषकात भारतीय विरुद्ध वेस्ट इंडिज सामना बुधवारी केपटाऊन येथे झाला. टीम इंडियाने वेस्ट इंडीजवर सहा गडी राखून विजय मिळवित विश्वचषकातील दुसऱ्या सामन्यात दणदणीत विजय मिळवला. नाणेफेक जिंकलेल्या वेस्ट इंडीज संघाने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. या सामन्यातून भारतीय संघाची उपकर्णधार स्मृती मंधानाने पुनरागमन केले, तर पुणेकर अष्टपैलू देविका वैद्य हिलादेखील संघात संधी मिळाली होती.



वेस्ट इंडीजने ठेवलेल्या ११९ धावांचे माफक आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली. पहिल्या दोन षटकातच पाच चौकार मारत स्मृती मंधाना आणि शफाली वर्मा यांनी कॅरेबियन गोलंदाजांवर बरसल्या, मात्र स्मृती १० धावांवर बाद झाली. पाकिस्तान विरुद्धच्या सामन्यात उत्कृष्ट खेळी करणारी जेमिमाह अवघ्या एका धावेवर बाद झाली. सलामीवीर शफाली वर्मा चांगल्या फॉर्मात होती, मात्र खराब फटका खेळून ती बाद झाली. तिने २८ धावा केल्या.

कर्णधार हरमनप्रीत कौर आणि यष्टीरक्षक रिचा घोष यांच्यात अर्धशतकी भागीदारी झाली. त्याच्या जोरावर भारताने दुसरा विजय साकार केला. कर्णधार हरमनप्रीत कौरने ३३ धावा करून बाद झाली तर रिचा घोष ४४ धावा करून नाबाद राहिली. वेस्ट इंडीजकडून करिश्मा रामहारकने सर्वाधिक दोन तर हेली मॅथ्यूजने आणि चिनेल हेन्रीने प्रत्येकी एक विकेट घेतली.

तत्पूर्वी, गोलंदाजीच्या शानदार फॉर्ममध्ये असलेल्या दीप्तीने या सामन्यात सर्व क्षणी गोलंदाजी केली. पॉवर प्ले, मधली षटके तसेच डेथ ओवर्समध्ये तिने गोलंदाजी केली. तिने आपल्या चार षटकांमध्ये केवळ १५ धावा देत तीन फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. यासोबतच तिने टी-२० क्रिकेटमध्ये १०० विकेट्स पूर्ण केले. अशी कामगिरी करणारी ती पहिलीच भारतीय गोलंदाज ठरली. या सामन्याचा विचार केल्यास भारतीय गोलंदाजांनी प्रथम गोलंदाजी संधी मिळाल्यावर वेस्ट इंडीज संघाला दबावात ठेवले. कर्णधार मॅथ्यूज दुसऱ्या षटकात बाद झाल्यानंतर टेलर व कॅम्पबेल यांनी ७३ धावांची भागीदारी केली, मात्र त्यानंतर दीप्ती व इतर गोलंदाजांनी धारदार गोलंदाजी करताना वेस्ट इंडिजला ११९ पर्यंत मर्यादित ठेवले. दीप्ती व्यतिरिक्त पूजा वस्त्राकार व रेणुका सिंग यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत रामशेठ ठाकूर विद्यालयास कांस्यपदक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांच्या वतीने १४ व १५ फेब्रुवारीदरम्यान राज्यस्तरीय शालेय कराटे स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, बारामती जि. पुणे येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील आनंद पराते याने १९ वर्षांखालील मुलांच्या ७० ते ७४ या वजन गटात सहभाग घेऊन कांस्यपदक मिळविले आहे.

आनंद पराते याची पहिली लढत नागपूर विभागातील यापूर्वी विभागस्तरावर निवड झालेल्या मृत्युंजय खांडिया याच्याशी झाली. ही लढत आनंद पराते याने जिंकून उपउपांत्य फेरीस पात्र झाला. उपउपांत्य फेरीमध्ये आनंदची लढत कोल्हापूर विभागातील राज्यस्तरीय खेळाडू दुर्वेश भोसले याच्याशी झाली. या अटीतटीच्या लढतीमध्ये आनंद पराते याने शेवटच्या क्षणापर्यंत झुंजार खेळी केली. या स्पर्धेत आनंदने कांस्य पदक पटकावले.

या उज्ज्वल कामगिरीबद्दल आनंद पराते यास मान्यवरांच्या हस्ते प्राविण्य प्रमाणपत्र, कांस्यपदक देऊन गौरविण्यात आले. उच्च माध्यमिक विभागाचे क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील यांनी आनंदला योग्य



मार्गदर्शन व सराव करून घेतला होता, तसेच प्राचार्या निशा नायर यांनी प्रोत्साहन दिले. राज्यस्तरीय स्पर्धेत चमकदार कामगिरी केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्राचार्या निशा नायर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आनंदचे अभिनंदन केले.

# माथेरानच्या हुमेरा काझीची मुंबई इंडियन्स संघात निवड

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

महिला प्रीमियर लीग २०२३ येत्या ४ मार्चपासून सुरू होणार आहे. या स्पर्धेत माथेरानमधील हुमेरा काझी हिची निवड झाली आहे. ती मुंबई इंडियन्सकडून खेळणार आहे.



महिला आयपीएलच्या पहिल्या हंगामासाठी खेळाडूंचा नुकताच लिलाव झाला आहे. यामध्ये माथेरानमधील हॉटेल व्यावसायिक जमीर काझी यांची कन्या हुमेरा काझीची निवड झाली आहे. मुंबई इंडियन्स संघाचे प्रतिनिधीत्व ती करणार असल्याने माथेरानच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

२०११मध्ये इलेव्हन स्टार क्रिकेट संघाच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धेदरम्यान गुणगौरव व पारितोषिक सोहळ्यात माथेरानच्या राम चौकात हुमेरा काझी हिचा माथेरानकर व इलेव्हन स्टार क्रिकेट संघाकडुन कौतुक सोहळा झाला होता. हुमेरा काझी त्यावेळी १६ वर्षे वयोगटात महिला क्रिकेट संघात खेळत होती.

आजपर्यंतच्या कामगिरीत तिने अष्टपैलू खेळाडू म्हणून संघामध्ये आपले स्थान प्रस्थापित केले आहे. आता तिची निवड महिला आयपीएलसाठी मुंबई इंडियन्स संघात झाल्याने हुमेरावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# किक बॉक्सिंग स्पर्धेत रायगडच्या कराटेपटूंचे सुयश

**पेण : प्रतिनिधी**

ऑल महाराष्ट्र स्टेट ज्युनिअर आणि सीनियर किक बॉक्सिंग स्पर्धा ११ ते १३ फेब्रुवारीदरम्यान शिर्डी येथे झाली. या स्पर्धेत किक बॉक्सिंग असोसिएशन पनवेल व युथ कराटे स्पोर्ट्स अकॅडमी पेण तसेच माणगाव, उरण या संघाने घवघवीत यश संपादन करून या स्पर्धेची प्रथम क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्रॉफी आपल्या पनवेल सिटी टीमच्या नावावर केली.

या स्पर्धेत खेळाडूंनी महाराष्ट्र राज्यात आपले प्रथम स्थान निश्चित करून महाराष्ट्रात आपले वर्चस्व ठेवले आहे. या स्पर्धेत ३० गोल्ड मेडल,१३ सिल्वर मेडल व १६ बॉन्झ मेडल जिंकून विद्यार्थ्यांनी रायगड जिल्ह्याची मान उंचावली आहे. या



स्पर्धेत किक बॉक्सिंग असोसिएशनचे राज्य अध्यक्ष निलेश शेलार यांचे मार्गदर्शन लाभले आहे, तसेच ही स्पर्धा जयेश चौगुले पनवेल सिटी अध्यक्ष भूपेंद्र गायकवाड, प्रशिक्षक संतोष मोकल, केदार खांबे, दीक्षा जैन, धनेशा असिस्टंट कोच यांचे मार्गदर्शन लाभले आहे. हे यश संपादन केल्यामुळे सर्व खेळाडू व प्रशिक्षकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### डायरेक्ट व्हॉलिबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी

# आमदार चषक स्पर्धेचे अलिबागला यजमानपद

**रेवदंडा : प्रतिनिधी**

सन २०२२-२३च्या राज्य पुरूष व महिला अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन अलिबाग येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचे यजमानपद रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलिबॉल असोसिएशनने स्विकारले असून स्पर्धेस आमदार महेंद्र दळवी यांनी पुरस्कृत केले आहे.

राज्य असोसिएशनच्या मान्यतेने एम. डी. फाउंडेशन थळ, अलिबाग व रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलिबॉल असोसिएशन यांच्या सौजन्याने या स्पर्धेचे आयोजन २५ ते २६ मार्चदरम्यान करण्यात आले आहे. आयोजकांचे वतीने स्पर्धेत सर्वांचा सन्मान केला जाणार असून विजेत्या संघांना व गुणवंत खेळाडूंना आकर्षक बक्षिसे देण्यात येतील. महाराष्ट्र व्हॉलिबॉल असोसिएशनचे अध्यक्ष डी. बी. साळुंखे यांनी आमदार महेंद्र दळवी यांनी जो विश्वास टाकला आहे, तो विश्वास व्हॉलिबॉल असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व अध्यक्ष नात्याने सार्थ करेन व उत्कृष्ट व यशस्वी स्पर्धा पार पाडू असे मत व्यक्त केले.

अलिबाग येथील डायरेक्ट व्हॉलिबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाची निवड केली जाईल व निवड झालेले खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.

# खेळाडूंना अद्ययावत सुविधा देणार -उपमुख्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विविध क्रिडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावत असून शासनामार्फत खेळाडूंच्या विजयी वाटचालीसाठी अधिक अद्ययावत, व्यापक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बोरिवली स्पोर्ट्स अँड कल्चरल असोसिएशनतर्फे आयोजित बोरिवली खेल महोत्सव २०२३ या ठिकाणी उपमुख्यमंत्री बोलत होते. या वेळी खासदार गोपाळ शेट्टी (उत्तर मुंबई), आमदार प्रवीण दरेकर, बोरीवलीचे आमदार आणि खेळ महोत्सवाचे संयोजक सुनील राणे, दहीसरच्या आमदार मनिषा चौधरी, कांदिवलीचे आमदार योगेश सागर, कुस्तीपटू तथा थलिट नरसिंग पंचम यादव, यांच्यासह खेळाडू व कुस्तीरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी शासन विविध उपक्रम सातत्याने राबवित असून खेळाडूंच्या कौशल्याची दखल घेऊन तीन वेळा महाराष्ट्र केसरी झालेल्यांना यापूर्वी शासकीय सेवेत नियुक्ती दिलेल्या आहेत. नुकत्याच पुण्यात झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत आपण महाराष्ट्र केसरी, हिंद केसरी यांसह कुस्तीमध्ये विविध किताब जिंकलेल्या खेळाडूंच्या मानधनातही तीन पटरने वाढ केली आहे. खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी महाराष्ट्रात खेळाडूंना चांगले प्रशिक्षक, उत्तम प्रशिक्षण सुविधा, शारीरिक तंदुरुस्तीसाठी आवश्यक पोषणतत्वे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन यासह सर्व पूरक सुविधा शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र केसरी जागतिक विजेता पृथ्वीराज पाटील आणि एशियन चॅम्पियन इरानचे हुसेन रमजानी यांची विशेष लढत झाली. या लढतीत विजयी झालेल्या पृथ्वीराज पाटीलचा आणि प्रतिस्पर्धी कुस्तीपटू हुसेन रमजानीचा उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते फेटा, गदा देऊन सत्कार करण्यात आला, तसेच त्याचे मान्यवरांनी कौतुक केले.

# महिला आयपीएलचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला प्रीमिअर लीगसाठी लिलाव प्रक्रिया नुकतीच पार पडली आहे. त्यानंतर आता बीसीसीआयने महिला प्रीमिअर लीगसाठीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार डब्ल्यूपीएलमध्ये एकूण २० सामने असतील. ही स्पर्धा एकूण २३ दिवस चालणार आहे.

महिला आयपीएलला येत्या ४ मार्चपासून सुरुवात होणार आहे. या हंगामातील पहिली लढत गुजरात जायंट्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात होणार आहे. ४ मार्चपासून सुरू झालेल्या या स्पर्धेचा अंतिम सामना २६ मार्च रोजी खेळवला जाणार आहे. हा अंतिम सामना ब्रेबॉर्न स्टेडियममध्ये खेळवला जाईल.

या पहिल्या हंगामात एकूण २० साखळी सामने खेळवले जातील. त्यानंतर दोन प्लेऑफ सामने होतील. या स्पर्धेत एकूण चार दिवस दोन सामने खेळवले जातील. या चार दिवसांत पहिला सामना दुपारी ३ वाजता खेळवला जणार आहे, तर अन्य सर्व सामने रात्री ७.३० वाजता खेळवले जातील. एलिमिनेटर सामना २४ मार्च रोजी डीवाय पाटील स्टेडियमवर खेळवला जाईल.





**पनवेल : श्रीगणेश न्हावेखाडी क्रिकेट क्लबतर्फे माजी खासदार लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर चषकाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी भेट दिली. त्यांचे क्लबच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्याचप्रमाणे स्पर्धेतील सामनावीराला ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य सागर ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता भगत, सी. एल. ठाकूर, राम मोकल आदी उपस्थित होते.**

# कराटे स्पर्धेत मुरूडच्या विद्यार्थ्यांची कामगिरी



**मुरुड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग येथील नेहुली क्रीडा संकुलात नुकत्याच घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत मुरुड येथील सिको काई कराटे इंटरनॅशनल इंडिया क्लासच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केल्याबद्दल सर्वत्र कौतुक केले.

कलिका सिंगे हिने कांस्यपदक, रजतपदक; प्रार्थना कौलकर दोन कांस्यपदक, स्वरूप पवार सुवर्णपदक, कांस्यपदक; वैभवी घोगेवाड दोन रजतपदक, ईशान विरकूड कांस्यपदक, रजतपदक; अस्मि भायदे दोन रजतपदक, वरद मोहिते सुवर्णपदक, कांस्यपदक; सार्थक कौलकर दोन रजतपदक, सई फुलमाळी कांस्यपदक, रजत पदक, सुमित घोगेवाड दोन रजतपदक, यासिन मणियार दोन रजतपदक, आराध्य नाईक दोन रजतपदक पटकाविले. या सर्व कराटेपटूंना जिल्हा कराटे मुख्य प्रशिक्षक रुपेश दांडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# सेल्फीला नकार दिल्याने पृथ्वी शॉवर गुंडांकडून हल्ला



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघातील फलंदाज पृथ्वी शॉच्या गाडीवर मुंबईत हल्ला झाला. पृथ्वी शॉ मित्राच्या गाडीत बसला होता. तिथल्या काही लोकांनी त्याला सेल्फी घेण्यास सांगितले, मात्र त्याने नकार दिल्याने त्यांनी संतप्त होऊन कारवर हल्ला केला.

पृथ्वी शॉवरील हल्ल्याप्रकरणी आठ जणांवरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे मुंबई पोलिसांनी सांगितले. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. एफआयआरनुसार, आरोपींविरुद्ध आयपीसीच्या कलम १४३, १४८, १४९, ३८४, ४२७, ५०४ आणि ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पृथ्वी शॉवर बुधवारी दुपारी चारच्या सुमारास हल्ला झाला. क्रिकेटपटू पृथ्वी शॉवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी आठ अनोळखी लोकांविरुद्ध एफआयआर नोंदवला आहे. आरोपीचा शोध सुरू असल्याचे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

# हभप.वै.मधुमाऊली चषकाचा वाघजाई संघ मानकरी

**चौक : रामप्रहर वृत्त**

जय भवानी तरूण विकास मंडळाने आयोजित केलेल्या हभप. वै. मधुबुवा माऊली समाज स्तरीय कबड्डी सामन्यात वाघजाई क्रीडा मंडळ कोळकेवाडी चिपळूण संघाने जिंकला.



खालापूर तालुक्यातील मौजे वावंढळ येथील हभप. वै. मधुकर कदम यांच्या स्मरणार्थ या कबड्डी स्पर्धांचे आयोजन या वेळी मंडळाचे राष्ट्रीय खेळाडू, अर्जुन पुरस्कार प्राप्त अशोक शिंदे, सरपंच सुहास कदम, चिपळूणचे माजी सभापती बळीराम शिंदे, विजय मोरे, दिलीप कदम, सुधीर ठोंबरे, सुनील गायकवाड यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. स्पर्धेत द्वितीय क्रमांक केदारनाथ क्रीडा मंडळ वेळे पनवेल, तृतीय क्रमांक कादवड क्रीडा मंडळ कादवड चिपळूण, चतुर्थ क्रमांक कळकवणे क्रीडा मंडळ कळकवणे चिपळूण, सर्वोत्कृष्ट खेळाडू साईराज कुंभार, उत्कृष्ट चढाई निखिल कदम, उत्कृष्ट पकड शुभम शिंदे, उदयोन्मुख खेळाडू आकाश कदम, शिस्तबद्ध संघ वाघजाई क्रीडा मंडळ कोळकेवाडी शहापूर यांना गौरविण्यात आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com